## -: प्रकरण चार :-

## संशोधनासाठी संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ

### ** "अ" विभाग **

"मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचे सामर्थ्य व उपयुक्तते विषयी माहिती :-

४:१ प्रास्ताविक

४:२ प्रश्नावल्या भरून देणाऱ्या शिक्षकांची सर्वसाधारण माहिती

४:३ प्रश्नावल्या भरून देणाऱ्या अधिव्याख्यात्यांची सर्वसाधारण माहिती

४:४ मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील तात्त्विक भागाची माहिती

४:५ मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक भागाची माहिती

४:६ प्रस्तुत संशोधना संदर्भात अन्य उपयुक्त माहिती

---

### "ब" विभाग

४:७ प्रास्ताविक

४:८ अनेक वर्षे मराठी अध्यापन पध्दती शिकविलेल्या आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालयात नोकरीत असणाऱ्या शिक्षक प्रशिक्षकांच्या मुलाखती घेऊन मिळविलेली माहिती.

४:९ प्रस्तुत संशोधनास अन्य उपयुक्त माहिती

४:१० समारोप

## मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचे सामर्थ्य आणि उपयुक्ततेविषयी माहिती

### ४:१ प्रास्ताविक :-

प्रकरण तीन मध्ये प्रस्तुत संशोधनाच्या कार्यात वर्तमान परिस्थिती अभ्यासावयाची असल्याने सर्वेक्षण पध्दतीचे विश्लेषण निवडले आहेत. या पध्दतीने मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचा चिकित्सात्मक अभ्यास करण्यासाठी (मराठी अध्यापन पध्दती घेऊन बी. एड्. पदवीच्या सुधारित अभ्यासक्रमाचा अभ्यास केला आहे. आणि आता माध्यमिक शाळेत नोकरीला आहेत, अशा शिक्षक - शिक्षिकांसाठी एक प्रश्नावली तयार केली) दुसरी प्रश्नावली "शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रम शिकविणा-या प्राध्यापकासाठी तयार केली. या प्रश्नावल्यांचे वर्गीकरण सारणी क्रमांक २:१ आणि २:२ मध्ये सविस्तर दिले आहे. कोल्हापूर जिल्हया मध्ये एकूण १३ शिक्षणशास्त्र महाविद्यालय कार्यरत आहेत. त्यापैकी ०२ अनुदानित महाविद्यालये आहेत आणि ११ शिक्षणशास्त्र महाविद्यालय विनाअनुदानित आहेत. (या १३ पैकी ०६ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षकांनी मराठी अध्यापन पध्दतीच्या शिक्षकासाठी तयार केलेली प्रश्नावली [ परिशिष्ट "अ" ] प्रस्तुत संशोधिकेच्या समोर भरुन दिल्या) तोच ६ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून मराठी अध्यापन पध्दती शिकविणा-या अधिव्याख्यात्यांनी प्रश्नावल्या सविस्तर, पूर्ण भरून दिल्या, ०२ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून मराठी अध्यापन पध्दतीचा अधिक अनुभव असलेल्या, सध्या सुधारित अभ्यासक्रम घेत असलेल्या मराठी अधिव्याख्यात्यांना उचित, प्रसंगोत्पात मराठी अध्यापन पध्दतीचे मार्गदर्शन करण्यास सक्षम असलेल्या, मराठीचे अधिव्याख्याते व प्राचार्य पदावर कार्यरत असलेल्या प्रतिसादकांनी त्यांच्या भेटीच्या वेळी संशोधिकेला प्रश्नावल्या भरून दिल्या. अशा प्रकारे (१३ - ०२) मराठी अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावल्यांचे विश्लेषण व १४० शिक्षकांच्या प्रश्नावलींचे विश्लेषण प्रस्तुत प्रकरणाच्या "अ" विभागात केलेले आहे. याच प्रकरणाच्या "ब" विभागामध्ये मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमात निर्माण झालेले दौर्बल्य काढून टाकण्याच्या प्रयत्नांचे विश्लेषण केले आहे. तसेच मराठी अध्यापन पध्दतीचा अधिकाधिक अनुभव असलेल्या शिक्षक -प्रशिक्षकांच्या मुलाखती व प्रत्यक्ष भेटी घेतलेल्या आहेत. त्यामध्ये मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व वर्गीकरण केले आहे.

४:२ प्रश्नावल्या भरून देणाऱ्या शिक्षकांच्या सर्वसाधारण माहिती :-

सदर प्रश्नावल्या एकूण १४० शिक्षकांनी भरून दिल्या आहेत. [परिशिष्ट "अ] या प्रश्नावल्या भरून देणाऱ्या मराठी अध्यापन पद्दती असलेल्या शिक्षकांची नावे व त्यांच्या नोकरी करत असलेल्या शाळांची नावे परिशिष्ट "क" मध्ये दिली आहेत. या प्रश्नावली मध्ये प्रश्न क्रमांक ३ मध्ये त्यांच्या पदवी परीक्षेचे विषय विचारले होते. त्याची माहिती खालील सारणीत दिली आहे.

सारणी क्रमांक ४:१

शिक्षकांच्या पदवी परीक्षेचे विषय :-

| अ.नं. | पदवी परीक्षेचे विषय | मुख्य विषय शिक्षकांची संख्या | गौण विषय शिक्षकांची संख्या |
|---|---|---|---|
| १] | मराठी | १४० | |
| २] | हिन्दी | | ८० |
| ३] | इतिहास | | १२० |
| ४] | भूगोल | | ६० |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, पदवी परीक्षेला १४० शिक्षकांचा मराठी हा मुख्य विषय आहे. आणि हिन्दी हा गौण विषय असलेल्या शिक्षकांची संख्या ८० आहे. तसेच इतिहास हा गौण विषय असलेल्या शिक्षकांची संख्या १२० आहे. आणि भूगोल हा गौण विषय असणाऱ्या शिक्षकांची संख्या ६० आहे.

शिक्षकांच्या प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक ४ मध्ये त्यांच्या पदव्युत्तर परीक्षेचे विषय कोणते होते ? ते विचारले होते. हा प्रश्न विचारण्या पाठीमागील हेतु हा होता की, त्यांच्या पदव्युत्तर परीक्षेचा विषय जाणून घेणे. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत सारणी क्रमांक ४:२ मध्ये नोंदविला आहे.

...

सारणी क्रमांक ४:२

शिक्षकांच्या पदव्युत्तर परीक्षेचे विषय

| अ.नं. | पदव्युत्तर परीक्षेचे विषय | पहिला शिक्षकांची संख्या | दुसरा शिक्षकांची संख्या |
|---|---|---|---|
| १] | मराठी | १४० | |
| २] | अर्थशास्त्र | | ८० |
| ३] | इंग्रजी | | ६० |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, पदव्युत्तर परीक्षेला १४० शिक्षकांचा मराठी हा पहिला विषय आहे आणि अर्थशास्त्र हा दुसरा विषय असलेल्या शिक्षकांची संख्या ८० आहे. तसेच इंग्रजी हा दुसरा विषय असलेल्या शिक्षकांची संख्या ६० आहे.

शिक्षकांच्या प्रश्नावली मध्ये प्रश्न क्रमांक ५ मध्ये त्यांच्या बी. एड्. परीक्षेच्या अध्यापन पध्दती विचारल्या होत्या. त्याची माहिती खालील सारणीत, सारणी क्रमांक ४:३ मध्ये दिली आहे.

सारणी क्रमांक ४:३

शिक्षकांच्या बी. एड्. परीक्षेच्या अध्यापन पध्दती

| अ. नं. | बी. एड्. परीक्षेच्या अध्यापन पध्दती | मुख्य शिक्षक संख्या | गौण शिक्षक संख्या |
|---|---|---|---|
| १] | मराठी | १४० | |
| २] | हिन्दी | | ८० |
| ३] | इतिहास | २० | १०० |
| ४] | भूगोल | | ६० |
| ५] | पी.ई. | ० | ० |
| ६] | अर्थशास्त्र | | ८० |
| ७] | इंग्रजी | | ६० |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, बी. एड्. परीक्षेला १४० शिक्षकांची मराठी ही मुख्य अध्यापन पध्दती आहे. हिन्दी ही दुसरी गौण अध्यापन पध्दती असलेल्या शिक्षकांची संख्या ८० आहे. इतिहास ही गौण अध्यापन पध्दती असलेल्या शिक्षकांची संख्या १०० आहे. तसेच इतिहास ही मुख्य अध्यापनपध्दती असलेल्या शिक्षकांची संख्या २० आहे. भूगोल ही गौण अध्यापन पध्दती असलेल्या शिक्षकांची संख्या ६० आहे. शारिरिक शिक्षण ही अध्यापन पध्दती कोणाही शिक्षकांची नाही. अर्थशास्त्र ही गौण अध्यापन पध्दती असलेल्या शिक्षकांची संख्या ८० आहे. आणि इंग्रजी ही गौण अध्यापन पध्दती असलेल्या शिक्षकांची संख्या ६० आहे.

वरील सारणी क्रमांक ४: १, ४:२ ४:३ वरून असे लक्षात येते की, माध्यमिक शाळेमध्ये मराठी अध्यापनपध्दतीच्या प्रश्नावलीला प्रतिसाद देणारे १४० शिक्षक आहेत. माध्यमिक शाळेतील मराठी विषय शिकविण्यासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व एवढेच नव्हे तर त्यांची पदव्युत्तर पदवी देखील मराठी विषयातून आहे.

प्रस्तुत प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ६ नुसार शिक्षकांना माध्यमिक शाळेत शिकवावे लागणारे विषय विचारले होते. हा प्रश्न विचारण्याचा हेतू हे शिक्षक कोणता विषय शिकवितात हे जाणून घेणे हा होता. या प्रश्नाला दिलेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी क्रमांक ४.४ ] नोंदविलेला आहे.

सारणी क्रमांक ४:४

शिक्षकांना माध्यमिक शाळेत शिकवावे लागणारे विषय :-

| अ.नं. | सध्या शिकवित असलेले अध्यापन विषय | शिक्षकांची संख्या |
|---|---|---|
| १] | मराठी | १४० |
| २] | हिन्दी | ०८० |
| ३] | भूगोल | - |
| ४] | इतिहास | १२० |
| ५] | शारीरिक शिक्षण | १.१० |
| ६] | अर्थशास्त्र | ८० |
| ७] | इंग्रजी | ६० |

वरील सारणीवरून असे लक्षात येते की, "मराठी" विषयाचे माध्यमिक शाळेत अध्यापन कराव्या लागणा-या शिक्षकांची संख्या, माध्यमिक शाळेमध्ये अन्य विषय शिकविणा-या संख्येपेक्षा अधिक आहे. प्रतिसाद देणारे शिक्षक "मराठी" हा विषय शिकवितात.

४:५

प्रश्नावल्या भरून देणा-या अधिव्याख्यात्यांची सर्वसाधारण माहिती :

सदर प्रश्नावली एकूण (१४) मराठी अधिव्याख्यात्यांनी भरून दिली आहे. ही प्रश्नावली भरून देणा-या मराठी अध्यापन पध्दतीचे अध्यापन करणा-या अधिव्याख्यात्यांची व त्यांच्या नोकरी करत असलेल्या कॉलेजची नावे परिशिष्ट "इ" मध्ये दिली आहेत. या प्रश्नावलीमधील १ ते २ प्रश्नांचे विश्लेषण पुढील सारणीत [सारणी क्र.४.५] केले आहे.

सारणी क्रमांक ४:५

अधिव्याख्यात्यांची शैक्षणिक अर्हता

| अ.नं. | अधिव्याख्यात्याचे नांव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १] | श्री. सांगळे के. एन्. ✓ | एम.ए.एम्.एड्. एम्.फिल, [शिक्षणशास्त्र] |
| २] | श्री. पाटील विलास हिंदूराव | एम.ए.एम.एड.यु.जी.सी.नेट [मराठी] |
| ३] | श्री.दीक्षित शिरीष सदाशिव | एम.ए.एम.~~एड्.यु.जी.सीनेट,~~ [~~मराठी~~] Ph.D. |
| ४] | श्री.वैदांते मधुकर भाऊराव | एम.ए.एम.एड्.एम.फिल. |
| ५] | श्री.सोळ्से बलाप्पा बाळाप्पा | एम.ए.एम.एड् |
| ६] | श्री.पत्रावळे अनिता अजित | एम.ए.एम.एड्. |
| ७] | श्री.सोलापूरे गजानन आण्णा | एम.ए. एम्.एड्. |

| अ.नं. | अधिव्याख्यात्यांचे नांव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| ८] | श्री. पाटील विश्वनाथ रंगराव | एम. ए. एम्. एड् |
| ९] | श्री. सौ. सरपोतदार प्राची अशोक | एम.ए. एम. एड्. |
| १०] | श्री. ढवळे गोपाळकृष्ण मुरलीधर | एम.ए.एम.एड.एम.फिल. |
| ११] | श्री. रायकर शिवाजी मारुती | एम.ए. एम्. एड्. |
| १२] | श्री. कांबळे एस. बी. | एम.ए. एम.एड्,एम.फील |
| १३] | श्री. सरदेसाई | एम. ए. एम. एड् |
| १४] | श्री. भोसले नंदिनी | एम. ए. एम. एड् |
| १५] | श्री. [illegible] एस. बी. | एम. ए. एम. एड् |

वरील सारणी वरून असे माहित होते की, एकूण १३ शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये सुधारित मराठी अध्यापन पध्दती शिकवणारे १३ अधिव्याख्याते आहेत. त्यापैकी तीन अधिव्याख्यात्यांनी एम. फिल. पदवी संपादन केली आहे. तसेच एका अधिव्याख्यात्यांनी यु. जी. सी. नेट परीक्षा मराठी विषयातून प्राप्त केली आहे. बाकीच्या नऊ अधिव्याख्यात्यांनी एम्. ए. एम्.एड्. ही पदव्युत्तर पदवी संपादन केली आहे. तसेच या १५ पैकी २ अधिव्याख्याते व प्राचार्य म्हणून ही कार्य करतात.

याचा अर्थ असा की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अध्यापन करण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता एम. ए., एम. एड्., बी -+- असावी लागते. ही पात्रता प्रतिपादक असणाऱ्या मराठीच्या अधिव्याख्यात्यांच्याकडे आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या नियमानुसार ही अध्यापन पध्दती शिकविण्यास जे १५ अधिव्याख्याते आहेत, ते शैक्षणिक अर्हता पात्रताधारक आहेत.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावली मध्ये प्रश्न क्रमांक ४ ते ६ प्रश्नामध्ये त्यांच्या नोकरीची एकूण वर्षे , मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमा संदर्भात केलेल्या मार्गदर्शनाचा अनुभव, अध्यापनाचा अनुभव विचारला होता हे प्रश्न विचारण्याचा हेतू त्यांच्या नोकरीची, मार्गदर्शनाची, अध्यापनाची किती वर्षे पूर्ण झाली आहेत. हे जाणून घेणे हा होता. वरील प्रश्नांच्या अनुषंगाने मिळालेली माहिती पुढील सारणीत [ सा. क्र. ४.६ ] नोंदविलेली आहे.

सारणी क्रमांक ४.६

मराठी अधिव्याख्यात्यांच्या, नोकरीतील अनुभवाची वर्षे

मराठी अधिव्याख्यात्यांच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील नोकरीतील अनुभवाची वर्षे

| नोकरीची एकूण वर्षे | अधिव्याख्यात्यांची संख्या | मार्गदर्शनाचा अनुभव [वर्षात] | अध्यापनाच्या अनुभव [वर्षात] |
|---|---|---|---|
| १६ ते १८ वर्षे | ०१ | १८ | १८ |
| १३ ते १५ वर्षे | ०० | ०० | ०० |
| १० ते १२ वर्षे | ०५ | ११ | ११ |
| ०७ ते ०९ वर्षे | ०१ | ०८ | ०९ |
| ०४ ते ०६ वर्षे | ०३ | ०५ | ०४ |
| ०१ ते ०३ वर्षे | ०५ | ०३ | ०३ |

* * *

वरील सारणी क्रमांक ४.६ वरून अशी माहिती मिळते की, १ ते ३ वर्षापर्यन्त शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील नोकरीचा अनुभव असणारे ०५ अधिव्याख्याते आहेत. ४ ते ६ वर्षापर्यन्तचा नोकरीचा अनुभव असणारे ०३ अधिव्याख्याते आहेत. ७ ते ९ वर्षा पर्यन्तचा अनुभव असणारे एकच अधिव्याख्याते आहेत. १० ते १२ वर्षाचा अनुभव असणारे एकच अधिव्याख्याते आहेत. १० ते १२ वर्षाचा अनुभव असणारे ०५ अधिव्याख्याते आहेत. आणि १३ ते १५ वर्षाचा अनुभव असणारे कोणीही नाहीत. परंतु १६ ते १८ वर्षाचा अनुभव असणारेही एक अधिव्याख्याते आहेत.

सारणी क्रमांक ४·६ मधील मार्गदर्शनाच्या अनुभवाच्या स्तंभाचे निरीक्षण केले असता, असे आढळून येते की, १ ते ३ आणि १० ते १२ वर्षांचा मार्गदर्शनाचा अनुभव असणाऱ्या अधिव्याख्यात्याची ३३·३३ टक्केवारी आहे· १६ ते १८ वर्षे मार्गदर्शनाचा अनुभव असलेल्या अधिव्याख्यात्याची ६·६६ टक्केवारी आहे·

सारणी क्र·४·६ मधील अध्यापनाच्या अनुभवावरुन असे लक्षात येते की, १ ते ३ वर्षे अध्यापन केलेल्या अधिव्याख्यात्यांची संख्या ०५ म्हणजे ३३·३३ % आहे· आणि १८ वर्षे अध्यापन केलेल्या अधिव्याख्यात्यांची संख्या १ म्हणजे ६·६६ टक्के आहे· १३ ते १५ वर्षांच्या अध्यापनाचा अनुभव असणारे कोणीही नाहीत·

वरील सारणी क्र· ४·६ वरून असा अर्थ निघतो की, १९९० पासून नवीन शिक्षणशास्त्र महाविद्यालये सुरु करण्यात आली आहेत· त्यामुळे त्यांना अध्यापनाचा व मार्गदर्शनाचा अनुभव अधिक नाही· आणि नोकरीची १८ वर्षे पूर्ण असणाऱ्या अधिव्याख्यात्यांची संख्या कमी आहे·

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ७ मध्ये त्यांच्या पदवी परीक्षेच्या विषय विचारले होते· या प्रश्नाचा हेतू त्यांच्या पदवीचा विषय कोणता आहे हे जाणून घेणे हा होता·

सारणी क्रमांक ४·७

अधिव्याख्यात्यांच्या पदवी परीक्षेचे विषयक

| पदवी परीक्षेचे विषय | अधिव्याख्यात्यांची संख्या | |
|---|---|---|
| | मुख्य | गौण |
| मराठी | १५ | |
| इतिहास | | ०५ |
| इंग्रजी | | ०२ |
| भूगोल | | ०५ |
| हिन्दी | | ०० |
| अर्थशास्त्र | | ०२ |
| तत्वज्ञान | | ०१ |

वरील सा. क्र. ४.७ वरून अशी माहिती मिळते की, पदवी परीक्षेला मराठी मुख्य विषय असणाऱ्या प्रतिसादकांची संख्या १५ आहे. पदवी परीक्षेला गौण विषय म्हणून इतिहास व भूगोल असणाऱ्या अधिव्याख्यात्यांची संख्या ०५ आहे. तत्वज्ञान हा ही विषय एक अधिव्याख्यात्यांनी घेतला आहे तर हिन्दी हा गौण विषय कोणाचाच नाही.

याचा अर्थ असा आहे की, प्रश्नावलीतील प्रतिसादकाचा "मराठी" हाच मुख्य विषय पदवीला आहे.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीमधील प्रश्न क्रमांक ८ मध्ये त्यांच्या पदव्युत्तर परीक्षेचा विषय जाणून घेणे हा होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सा.क्र.४.८ ] नमूद केला आहे.

सारणी क्र. ४.८

अधिव्याख्यात्यांच्या पदव्युत्तर पदवीचे विषय ***

| पदव्युत्तर पदवीचे विषय | पहिला | दूसरा |
|---|---|---|
| मराठी | १५ | |
| इतिहास | | ०३ |
| इंग्रजी | | ०१ |

सारणी क्र. ४.८ वरून असे लक्षात येते की, पदव्युत्तर परीक्षेला अधिव्याख्यात्यांचा "मराठी" हाच पहिला विषय असणाऱ्यांची संख्या १५ आहे. त्याशिवाय पदव्युत्तर परीक्षेला दूसरा विषय इतिहास असणाऱ्यांची संख्या ०३ आहे. आणि इंग्रजी हा सुद्धा दूसरा विषय असणाऱ्यांची संख्या फक्त ०१ आहे.

याचा अर्थ असा होतो की, पदव्युत्तर पदवीला मुख्य विषय मराठी असणारे १५ प्रतिसादक आहेत.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ९ मध्ये विचारल्या होत्या. प्रश्नाचा हेतू त्यांच्या बी.एड्. परीक्षेच्या मुख्य व गौण अध्यापन पद्धती जाणून घेणे हा होता. या प्रश्नाला दिलेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्र.४.९] नमूद केला आहे.

सारणी क्र.४.९

-: अधिव्याख्यात्यांच्या बी. एड्. परीक्षेच्या अध्यापन पद्धती :-

| बी.एड्. पदवी परीक्षेचे विषय | पहिली अध्यापन पद्धती | दुसरी अ.प. |
|---|---|---|
| मराठी | १३ | |
| इतिहास | | ०४ |
| इंग्रजी | | ०४ |
| भूगोल | | ०४ |
| हिन्दी | | ०१ |

वरील सा.क्र.४.९ वरून असे लक्षात येते की, १३ अधिव्याख्यात्यांनी बी.एड्. परीक्षेला "मराठी" ही पहिली अध्यापन पद्धती घेतली आहे. तर दुसरी अध्यापन पद्धती इतिहास, इंग्रजी, भूगोल, असणाऱ्या अधिव्याख्यात्यांची संख्या प्रत्येकी ०४ आहे तर हिन्दी ही दुसरी पद्धती अध्यापन पद्धती घेतलेले एक अधिव्याख्याता आहेत.

याचा अर्थ असा की, बी. एड्. पदवी परीक्षेला अध्यापन पद्धती घेताना पदवी आणि पदव्युत्तर पदवीला असणाऱ्या "मराठी" विषयाचा विचार केला आहे. प्रश्नावलीला प्रतिसादक असलेल्याचा मराठी हाच मुख्य विषय आहे.

४ मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील तात्त्विक भागाची माहिती :-

शिक्षकासाठी तयार केलेल्या प्रश्नावलीत मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचा सैद्धान्तिक भाग प्रश्न क. ७ मध्ये तुम्ही बी. एड्. करत असताना मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम अभ्यासलेला आहे. हा पाठ्यक्रम मराठी भाषेचा कुशल शिक्षक तयार करण्यास योग्य आहे. असा होय/नाही या द्विपर्यायी स्वरूपाचा प्रश्न विचारला होता. यातील हवा असलेला पर्याय ठेवून नको असलेला पर्याय खोडण्यास सांगितला होत

शिक्षकानी या प्रश्नाला दिलेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी ४:५ ] नमूद केला आहे.

सारणी क्रमांक ४:५

मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील कुशलता :-

| अ.नं. | मराठी अध्यापन पद्धतीचा तात्त्विक भाग | शिक्षकांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १. | मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम कुशल शिक्षक बनण्याच्या दृष्टीने योग्य आहे शिक्षकांची मते | १३० | १३० 10 |

वरील प्रतिसादावरुन निरीक्षण केले असता असे दिसून येते की, संबंधित प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद म्हणजे मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम कुशल शिक्षक बनण्याच्या दृष्टीने योग्य आहे, असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण जास्त [ १३० ] म्हणजे ९२.८५ टक्के आहे. आणि बी. एड्. पदवीच्या मराठी अध्यापन पद्धतीमध्ये असलेला पाठ्यक्रम योग्य नाही असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण कमी [ १० ] म्हणजे ७.१५ टक्के आहे.

वरील माहितीवरुन असे म्हणता येते की, "होय" म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण "नाही" म्हणणाऱ्या शिक्षकांच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे.

म्हणून हा पाठ्यक्रम कुशल शिक्षक बनण्याच्या दृष्टीने "योग्य" आहे असे बहुमत दिसते.

मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाशी संबंधित अशाच स्वरुपाचा प्राध्यापकांच्या प्रश्नावली मध्ये सैद्धान्तिक भागात घटकांच्या सामग्रीचे संघटन" या विभागा मध्ये काही प्रश्न मुक्त व बंदिस्त स्वरुपाचे होते. मराठी विषयाचा कुशल शिक्षक तयार करण्याच्या दृष्टीने "मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील तात्त्विक भाग उपयुक्त आहे का" या संबंधी "होय", "नाही" या स्वरुपाचा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला दिलेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी क्र. ४:६ ] नमूद केला आहे.

## तारणी क्रमांक ४:६

कुशल शिक्षक तयार करण्याच्या दृष्टीने मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रम :-

| अ.नं. | मराठी अध्यापन पध्दतीच्या तात्त्विक भागा संबंधी तपशिल. | प्राध्यापकांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १. | मराठी विषयाचा कुशल शिक्षक तयार करण्याच्या दृष्टीने अधिव्याख्यात्यांची पाठ्यक्रमातील उपयुक्तता | १४ | ०१ |

वरील प्रतिसादावरुन निरीक्षण केले असता संबंधित प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद म्हणजे मराठी विषयाचा कुशल शिक्षक तयार करण्याच्या दृष्टीने मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रमातील तात्त्विक भाग उपयुक्त आहे, असे म्हणणा-या संख्या १४ आहे तर संबंधित पाठ्यक्रमातून मराठी विषयाचा कुशल शिक्षक तयार होण्याच्या दृष्टीने उपयुक्त नाही, असे म्हणणारे फक्त एक (०१) आहेत. यावरुन असे म्हणता येते की, हा पाठ्यक्रम कुशल शिक्षक तयार करतो असे मत असणारे संख्येने जास्त म्हणजे ९३.३३ टक्के आहेत.

याच प्रश्नामध्ये अधिव्याख्यात्यांना संबंधित पाठ्यक्रम उपयुक्त "असल्यास" कशाप्रकारे आणि "नसल्यास" का नाही असे संबंधित उपप्रश्न विचारले होते त्याचा प्रतिसाद "असल्यास" या उपप्रश्नांत अधिक मिळाला आहे. "कशाप्रकारे" या उपप्रश्नांची उपयुक्तता विधानाद्वारे सांगितली आहे. ही विधाने पुढे दिली आहेत.

उपयुक्ततेची माहिती सांगणारी विधाने :-

१] मराठी अध्यापन पध्दती घेतलेल्या प्रशिक्षणार्थींना मराठी अध्यापनाचे हेतू व उद्दिष्टांचे ज्ञान होते.

२] मराठी अध्यापनाच्या विविध पध्दती व तंत्रे यांचे ज्ञान होते.

३] मूल्यमापनाची तंत्रे समजण्यास उपयुक्त आहे.

४] शैक्षणिक साधनांच्या वापराचे कौशल्य मिळते.

५] विविध अध्यापन पध्दतींचा अभ्यास करता येतो.

६] मातृभाषेबद्दलच्या भाषिक महत्वाचे जाणीवपूर्वक आकलन होते.

७] उद्दिष्टानुवर्ती अभ्यासक्रम व त्यांचे अध्यापन यांचे अध्ययन होते.

८] सरावपाठाद्वारे अध्ययन कौशल्य विकसीत होते.

९] मूलभूत वैचारिक अधिष्ठान प्राप्त होते.

१०] अध्यापन पद्धतीची आदर्श तत्वे स्पष्ट होऊन ती वापरावयाचे मार्गदर्शन मिळते.

११] तात्त्विक भागातून शिक्षकांच्या अंगच्या विविध गुण कौशल्यांचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१२] मराठी अध्यापन पद्धतीचा सर्वांगिण आढावा घेतला आहे. अध्यापन पद्धती, तंत्रे, भाषिक कौशल्ये, दोष-उपाय, मराठी शिक्षक, मराठी पाठ्यपुस्तक, वार्षिक, घटक पाठनियोजन इ.

१३] मराठीच्या शिक्षकाला विविध अंगाचा उपयोग होतो. अध्यापन साहित्य, शिक्षकाची गुणवैशिष्ठे, तंत्रे इ.

१४] प्रत्यक्ष अध्यापन कार्य करीत असतांना तात्त्विक भाग अध्यापनाशी परस्पर पोषक व पुरक आहे. अध्यापनातील बारकावे निदर्शनास आणले जातात. अध्यापन प्रभावी व परिणामकारक होण्याच्या दृष्टीने आणि पार्श्वभूमी तयार करण्याच्या दृष्टीने इष्ट आहे.

१५] मराठीत अन्य विषयाचा समावेश, मातृभाषेचे अध्यापन, मातृभाषेचा शिक्षक मराठीचे पाठ्यपुस्तक इ. तून शिक्षकाची जडणघडण होऊ शकते.

१६] मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील तात्त्विक भागाच्या समग्र अभ्यासामुळे मराठी विषयाचा "कुशल शिक्षक" घडविण्याच्या प्रशिक्षणात सुयोग्य दृष्टीकोन देता येतो. यानुसार हा तात्त्विक भाग मराठीचा चांगला शिक्षक घडविण्यासाठी मार्गदर्शक व उपयुक्त वाटतो.

संबंधित पाठ्यक्रम कुशल शिक्षक तयार करण्याच्या दृष्टीने उपयुक्त नाही असे म्हणणाऱ्या प्राध्यापकानी पुढील कारण सांगितले आहे. ते असे की, मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमा संदर्भात संदर्भ वाचन दिलेले नाही. त्या वाचनाचा अध्यापनात कसा समावेश करता येईल याबद्दल फार थोडी माहिती मिळते.

मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम उपयुक्त आहे. अशी विधाने मांडणाऱ्या प्राध्यापकांच्या माहितीचा मतितार्थ असा की, कुशल शिक्षक

बनण्याच्या दृष्टीने मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम उपयुक्त आहे.

४.७ शिक्षकांसाठी तयार केलेल्या प्रश्नावली मध्ये ८ नंबरचा प्रश्न मुक्त व बंदिस्त होता. त्यामध्ये मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील कोणते घटक कुशल शिक्षक बनण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरले आहेत. अशा स्वरूपाचा शिक्षकांना प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसादर पुढील सारणीत [ सारणी क्रमांक ४:७ ] मध्ये दिला आहे.

सारणी क्रमांक ४:७

पाठ्यक्रमातील संबंधित घटकांची श्रेणी

| अ. नं. | पाठ्यक्रमातील मराठीचे घटक | शिक्षकांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | अत्यंत उपयुक्त | उपयुक्त |
| [१] | अभ्यासक्रमातील मराठीचे स्थान | १३२ | ०८ |
| [२] | मराठी अध्यापनाचे हेतू व उद्दिष्टे | १३२ | ०८ |
| [३] | मराठी अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके | ३५ | १०५ |
| [४] | मराठी अध्यापनाच्या विविध पद्धती, प्रयुक्त्या व तंत्रे | १२० | २० |
| [५] | अध्यापन अनुभव व अध्यापन साहित्य | १२० | २० |
| [६] | अध्यापनाचे नियोजन आणि संघटन | १२० | २० |
| [७] | मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन | ११० | ३० |
| [८] | मूल्यमापन पद्धती | १२० | २० |
| [९] | भाषा शिक्षक | १३२ | ०८ |

वरील सारणी वरुन अशी माहिती मिळते की, घटक क्र·१, २, ४, ५, ६ आणि ८, ९ हया घटकाना मिळालेला प्रतिसादर अधिक आहे· आणि घटक क्र·३, ७, या घटकांची प्रतिसाद तुलनेने कमी आहे· म्हणजे टक्के आहे·

शिक्षकांच्या प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ८ मध्ये ला संबंधित व जवळचा असा प्रश्न शिक्षकाना प्रश्न क्रमांक ९ मध्ये विचारला होता· तो प्रश्न तुम्हाला मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील कोणते घटक कुशल शिक्षक बनण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरले नाहीत·असा होतो· या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद फारच अल्प म्हणजे २० टक्के आहे· यावरून असा निष्कर्ष निघतो की, पाठ्यक्रमातील सर्व घटक शिक्षकांच्या दृष्टीने उपयुक्त आहेत·

प्रश्न क्रमांक ९ ला अनुसरुन त्याच प्रश्नातील उपप्रश्नात आणखी कोणत्या घटकाची भर पाठ्यक्रमात असावी म्हणजे मराठी अध्यापनपद्धतीच्या पाठ्यक्रमाची उपयुक्तता अधिकाधिक वाढेल असे विचारले होते या प्रश्नालाही मिळालेला प्रतिसाद फारचक अल्प म्हणजे टक्के आहे·

वरील घटकांचा का समावेश करावा अशा स्वरुपाचा प्रश्न शिक्षकांना प्रश्नक्रमांक ११ मध्ये विचारण्यात आला होता त्याची कारणे पुढील प्रमाणे सारणीत [ सारणी क्र· ४·६ ] दिली आहेत·

सारणी क्र·४·८

| सूचविलेली घटक | कारण |
|---|---|
| १] शुद्दलेखनाचे शास्त्र | सर्व अध्यापन पद्दती मधील शुद्दलेखनाच्या चुका टाळता येतात· |
| २] भाषांतरीत वाङ:मयीन अभ्यास | नवीन व जुन्या वाङ्मयाचा अभ्यास होतो· |
| ३] भाषा उत्पत्ती शास्त्र | शब्दांच्या वेगवेगळ्या छटा, रंग, रुप आकार कळतात· |
| ४] भाषा उच्चार शास्त्र [शहरी व ग्रामीण] | शुद्द भाषेचा वापर करता येतो· |

वरील सारणीवरून अशी माहिती मिळते की, मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमात आणखी काही घटकांचा समावेश करणे अत्यावश्यक आहे. ते घटक म्हणजे शुद्धलेखनशास्त्र, वाङ:मयीन अभ्यास, भाषा उत्पती शास्त्र भाषा उच्चार शास्त्र हे आहेत. सर्व अध्यापन पद्धतींना अत्यावश्यक भाषा मराठी आहे. वाङ:मयी साहित्याबद्दल अभिरुची व अभिवृत्ती निर्माण करता येते. भाष उत्पत्ती शास्त्रामुळे शब्दांच्या वेगवेगळ्या छटा, रंग, रूप, आकार कळण्यास मदत होते. तसेच भाषा उच्चार शास्त्राने ग्रामीण भाषेतील व शहरी भाषेतील फरक कळतो व अनेक नवीन शब्दांची देवाण - घेवाण करता येते.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम व्यापक आहे.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावली मध्ये प्रश्न क्र.१३ मध्ये पाठ्यक्रमाचा तात्त्विक भाग पुरेसा उपयुक्त नसल्यास त्यात आणखी कोणत्या घटकांचा भर घालणे आवश्यक आहे. अशा स्वरूपाचा मुक्त व बंदिस्त प्रश्नअधिव्याख्यातेना विचारण्यात आला होता. या घटकाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी क्र.४.९ ] दिला आहे.

सारणी क्रमांक - ४:९

मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील तात्त्विक भागात भरीस घालावे लागणारे घटक :-

| अ.नं. | पाठ्यक्रमांतर्गत घटक | अधिव्याख्यात्यांचीसंख्या |
|---|---|---|
| १] | व्याकरणाचे शास्त्र | १ |
| २] | शुद्धलेखन | १ |
| ३] | अध्यापनाच्या पद्धती - नाट्यीकरण | ८ |
| ४] | पद्यात्मक गद्य व गद्यात्मक पद्य यांचा संयुक्त विचार | १ |
| ५] | भाषा विकासाचा इतिहास | १ |
| ६] | मराठी अध्यापनाचे नव प्रवाह | १ |
| ७] | अध्यापनाची प्रतिमाने | १ |

वरील सारणीवरून अशी माहिती मिळते की, मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमात आणखी काही घटकांची भर घालणे आवश्यक आहे. हे घटक म्हणजे व्याकरणाचे शास्त्र, शुध्दलेखन, अध्यापनाच्या आणखी काही पध्दती, पद्यात्मक गद्य व गद्यात्मक पद्य यांचा संयुक्त विचार, भाषा विकासाच्याइतिहासाची जाणीव मराठी अध्यापनाचे नव प्रवाह, अध्यापनाची प्रतिमाने, या प्रमाणे आहेत. यावरून हा निष्कर्ष निघतो की, संबंधित पाठ्यक्रम व्यापक असला तरीही आणखी काही घटकांचा भार त्यामध्ये घालणे आवश्यक आहे.

सूचविलेल्या घटकांची भर घालणे का आवश्यक आहे. या स्वरूपाची प्रश्न क्रमांक १४ मध्ये कारणमिमांसा अधिव्याख्यातेना करावयास सांगितला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी क्रमांक ४.९ ]मध्ये दिला आहे.

सारणी क्रमांक ४:१०

| घटक क्रमांक | कारण मिमांसा |
|---|---|
| १ आणि २ | व्याकरणाचे शुध्दत्व टिकते. |
| ३ आणि ४ | सीमारेषे वरील वाङ:मयाचे अध्यापन करता येते. |
| | विविध अध्यापन पध्दती वापरण्याची माहिती मिळते. |
| ५ | मराठी भाषेचे अध्यापनातील महत्त्व कळते. |
| ६ आणि ७ | नवप्रवाहामुळे विविध पध्दतीची तात्त्विक माहिती होईल. प्रतिमानामुळे प्रशिक्षण चांगले होईल. ज्ञान व मनोरंजन वाढीस मदत होईल. |

अधिव्याख्यात्यांनी नमूद केलेली कारणे योग्यच आहेत. प्रकरण क्रमांक ५ मध्ये निष्कर्ष आणि शिफारशी करताना ही कारणे विचारात घेतली आहेत.

४.८ शिक्षकांच्या प्रश्नावली मध्ये प्रश्न क्र.१२ मध्ये मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील घटक दिले होते. आणि प्रत्येक घटकांतर्गत ते किती प्रमाणात उपयुक्त ठरले त्या विषयी त्यांचे मत पंचबिंदूश्रेणीत मांडावयास सांगितले होते. पंचबिंदू श्रेणीतील एका स्तंभात शिक्षकांना बरोबर[ ✓ ] असे चिन्हे करावयास सांगितले होते. हा प्रश्न शिक्षकांना मुक्त स्वरूपात विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [४.९] मध्ये दिला आहे.

सारणी क्रमांक ४.११

पाठ्यक्रमातील घटकांची उपयुक्तता

| अ.नं. | पाठ्यक्रमांतर्गत घटक | सर्वात जास्त | जास्त | सांगता येत नाही | सर्वात कमी | सर्वात कमी |
|---|---|---|---|---|---|---|
| १] | अभ्यासक्रमातील मराठीचे स्थान | १३० | | | १० | |
| २] | मराठी अध्यापनाचे हेतू व उद्दिष्टे | १३० | | | १० | |
| ३] | मराठी अभ्यासक्रम व पाठ्यक्रम पुस्तके | | १२५ | | १५ | |
| ४] | मराठी अध्यापनाच्या विविध पध्दती, प्रयुक्त्या व तंत्रे | | ११० | | २० | १० |
| ५] | अध्ययन, अनुभव व अध्यापन साहित्य | | १२० | | २० | |
| ६] | अध्यापनाचे नियोजन व संघटन | | १२५ | | १० | ०५ |
| ७] | मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन | २८ | ९२ | | १० | १० |
| ८] | मूल्यमापन पध्दती | ९५ | २५ | | १० | १० |
| ९] | भाषा शिक्षक | १३० | | | | १० |

वरील सारणीवरून अशी माहिती मिळते की, मराठीचे अभ्यासक्रमातील स्थान या घटकाला "सर्वातजास्त" या स्तंभामध्ये १३० शिक्षकांनी बरोबर असे चिन्ह केले तसेच मराठी अध्यापनाचे हेतू व उद्दिष्टे या घटकाला "सर्वात जास्त" या उच्च श्रेणी स्तंभा मध्ये १३० शिक्षकांनी बरोबर असे चिन्ह केले आहे. उपयुक्तता "कमी" या स्तंभात १० शिक्षकांनी बरोबर चिन्ह केले आहे. भाषा शिक्षक हा ९ नंबरचा घटक आहे. या घटकाला "सर्वात जास्त" या उच्च श्रेणीच्या स्तंभात १३० म्हणजे ९२.८५ टक्के शिक्षकांनी "बरोबर" असे चिन्ह केले आहे. तर या घटकाची उपयुक्तता "कमी आहे." असे म्हणणा-या शिक्षकांची संख्या फक्त १० म्हणजे ८.१५ टक्के आहे.

यावरून १, २, ९ या घटकांची मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमात सर्वात जास्त उपयुक्तता आहे असे मत मांडणा-या शिक्षकांची संख्या जास्त आहे.

मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील अनुक्रमे ३ व ६ हे घटक "मराठी अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके" आणि अध्यापनाचे नियोजन व संघटन " यावर आहेत. या घटकांचा प्रतिसाद १२५ म्हणजे ८९.२८ टक्के आहे. तर "मराठी अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके या घटकाला सर्वात कमी या कनिष्ठ श्रेणीत १५ म्हणजे १०.७१ शिक्षकांनी "बरोबर" असे चिन्ह केले आणि अध्यापनाचे नियोजन व संघटन या घटकाला 'कमी" या स्तंभात १० म्हणजे ०७.१४ टक्के व सर्वात कमी या स्तंभा मध्ये ५ म्हणजे ०३.५७ टक्के शिक्षकांनी बरोबर चिन्ह केले आहे.

मराठी अध्यापनाच्या विविध पद्धती, प्रयुक्त्या व तंत्रे" या चौथ्या घटकाला जास्त" या पंचबिंदू श्रेणी तील दुस-या स्तंभात ११० म्हणजे ७८.५७ टक्के, "कमी" या स्तंभात १० म्हणजे ०७.१४ टक्के शिक्षकांनी "बरोबर" चिन्ह केले आहे.

मराठी अध्ययन अनुभव व अध्यापन साहित्य या पाचव्या घटकाला "जास्त" या पंचबिंदू श्रेणीतील दुस-या स्तंभात १२० म्हणजे ८५.७१ टक्के आणि "कमी" या स्तंभात १० म्हणजे ०७.१४ टक्के, तसेच "सर्वात कमी" या स्तंभात १० म्हणजे ०७.१४ टक्के शिक्षकांनी बरोबर असे चिन्ह केले आहे.

वरील माहिती वरून हे लक्षात येते की, घटक क्र.१, २, ३, ९, ६,५० ४ हे क्रमानुसार जास्त उपयुक्त आहेत.

"मराठी भाषेच्या विविध आगांपागाचे अध्यापन या सातव्या

घटकाला "जास्त" या स्तंभामध्ये ९२ म्हणजे ६५·७१ टक्के, "सर्वात जास्त" या स्तंभात २८ म्हणजे २०·०० टक्के आणि कमी व सर्वात कमी या स्तंभात १० म्हणजे ०७·१४ टक्के शिक्षकांनी "बरोबर" असे चिन्ह केले आहे·

"मूल्यमापन पध्दती" या आठव्या घटकाला "सर्वात जास्त" या स्तंभा मध्ये ९५ म्हणजे ६७·८६ टक्के "जास्त" स्तंभा मध्ये २५ म्हणजे १७·८६ टक्के आणि "कमी" स्तंभामध्ये १० म्हणजे ०७·१४ टक्के तर "सर्वात कमी" मध्ये १० म्हणजे ०७·१४ टक्के शिक्षकानी "बरोबर" असे चिन्ह केले आहे·

वरील माहितीवरून हे निश्चित करता येते की, ७·८ नंबरच्या घटका पेक्षा बाकीचे १, २, ३, ४, ५, ६, ९ हे घटक कुशल शिक्षकाला अधिक उपयुक्त ठरतात·

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीत मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील घटकांचे गुणावगुण पहाण्याच्या दृष्टीने प्रश्न क्र· १५ विचारण्यात आला होता· या प्रश्नात अधिव्याख्यात्यांना पाठ्यक्रमा समोर गुणावगुण लिहिण्यास सांगितले होते· हा प्रश्न मुक्त स्वरूपाचा होता· या प्रश्नात मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील एकूण ९ घटक दिले होते· प्रत्येक घटका समोर त्या घटकाची गुण वैशिष्ठे "गुण" स्तंभात आणि त्यांचे अवगुण दोष किंवा तोटे "अवगुण" या स्तंभात नमुद करावयाचे होते· या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी क्र·४·१२] दिला आहे·

सारणी क्रमांक ४:१२

पाठ्यक्रमांतर्गत घटकाचे गुणावगुण

| अ·नं· | पाठ्यक्रमांतर्गत घटकांचा क्रमांक | गुण | अवगुण |
|---|---|---|---|
| १] | १ | मूलभूत संकल्पना समजण्यास आवश्यक आहे·<br>संस्कृतीची ओळख व मातृभाषेबद्दल आदर निर्माण होतो· | जागतिक पातळीवर मराठीचे स्थान सांगावे·<br>चुकीचा अभिमान पोसणार नाही· |

| अ.नं. | पाठ्यक्रमांतर्गत घटकांचा क्र. | गुण | अवगुण |
|---|---|---|---|
| | | साधन म्हणून योग्य आहे. सर्व वैशिष्ठ्ये योग्य आहेत. मराठी विषय का महत्त्वाचा हे समजते. मराठी मातृभाषेची अनेक दृष्टीने आवश्यकता, महत्त्व समजते. हा घटक योग्य आहे. मराठी बद्दल आत्मियता निर्माण होते. | |
| २ | २ | मार्गदर्शी व स्वीकारार्ह आहे. काय व कसे शिकवायाचे समजते सफलतेचे दृष्टीने चांगले परिपूर्ण आहे. मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे समजतात. त्यामुळे नवी दृष्टी मिळते. मराठी प्रथम भाषा म्हणून अध्यापनातील स्थान कळते. योग्य आहे. अध्यापनाला दिशादर्शी | |
| ३ | ३ | उपयुक्त संपूर्ण साधन पाठ्यपुस्तकाचा चिकित्सक अभ्यास करता येतो. माहितीच्या दृष्टीने योग्य आहे. परिपूर्ण आहे. पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण हा गुण आहे. आधारभूत साधन विवेचन | कालोचित असणे आवश्यक आहे. नेमकेपणा अधिक यावा. कालावधी लक्षात घेता घटक मोठा आहे. मराठी अभ्यासक्रमाच्या रचनेची पुरेशी कल्पना येत नाही. |
| ४ | ४ | प्रभावी व कृतीशील अध्यापनाला उपयुक्त विविध अध्यापन तंत्रांचा परिचय होतो. प्रयुक्त्या व तंत्रे यांचा समाधानकारक उपयोग होतो/स्तरानुसार व आशयानुसार योग्य आहे. | आणखी काही अध्यापन पद्धतींचा समावेश करावा. नाविन्याचा अभाव आहे. अध्या. पद्धतीवर भर हवा |

| अ.नं. | पाठ्यक्रमांतर्गत घटकांचा क्र. | गुण | अवगुण |
|---|---|---|---|
| | | पद्धतीचा वापर होतो.<br>विद्यार्थ्यांना उपयोगी आहे. | |
| ५ | ५ | मौखिक<br>आशयानुसार साहित्यसाधने तयार करता येतात.<br>घटकाचा समावेश योग्य आहे.<br>विविध अध्ययन अनुभव कोणते याची पुरेशी कल्पना येते.<br>अध्यापन साहित्याचा विविधांगी आढावा.<br>विद्यार्थ्यांना उपयुक्त, योग्य आहे. | हाताळण्याच्या कौशल्याचा अभाव<br>वेळेच्या दृष्टीने घटक मोठा आहे. |
| ६ | ६ | पूर्वतयारीस अत्यावश्यक, शक्य<br>मूल्यमापनासाठी आवश्यक माहिती<br>माहितीच्या दृष्टीने योग्य<br>घटकांचा समावेश केला आहे.<br>वेळेची बचत होते. योग्य आहे. | नियोजनास<br>प्रबोधनाची गरज |
| ७ | ७ | व्याप्ती, उपयोगिता समजते,<br>वेगवेगळ्या भागाचे अध्यापन कसे करावे हे समजते.<br>तात्त्विक भाग योग्य आहे.<br>योग्य अंगोपांगाचा समावेश आहे.<br>भाषिक कौशल्यांचे मूल्यमापन संवर्धनासाठी उपयोग होतो.<br>परस्परपूरकता आहे. | गद्यातील व पद्यातील विविध घटकांचे सखोल अध्यापन विषयक ज्ञान मिळत नाही.<br>कृती मध्ये अंमलबजावणी व्हावी. |
| ८ | ८ | आकलन वाचणे शक्य<br>मूल्यमापनाची गरज<br>मूल्यमापन पद्धतीमुळे मराठी विषयाच्या मूल्यमापनातील वेगळेपणा समजते.<br>सर्व उपक्रमांचा आढावा घेता येतो<br>आवश्यक व अपरिहार्य | केवळ मातृभाषेच्या दृष्टीने विचार हवा.<br>सातत्याचा अभाव आहे.<br>नवीन मूल्यमापन पद्धतीचा अभ्यास व्हावा. |

| अ.नं. | पाठ्यक्रमांतर्गत घटकांचा क्र. | गुण | अवगुण |
|---|---|---|---|
| १ | १ | * तौलनिक भाषांचा व्यासंगी शिक्षक आवश्यक<br>* गुण समजतात व आत्मसात करता येतात.<br>* अतीशय उपयुक्त घटक आहे<br>* मराठीच्या शिक्षकांच्या आवश्यक गुणांचा परिचय होतो.<br>* स्वत:च्या क्षमतांची, गुणांची जाणीव होण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे. | |

वरील सारणीच्या माहितीवरुन संबंधित पाठ्यक्रमांतर्गत समाविष्ट केलेल्या घटकांपैकी मराठी अध्यापनाचे हेतू व उद्दिष्टे या घटकांमध्ये अवगुण नाहीत इतर आठ घटकांत गुणाबरोबर अवगुणांचीही नोंद झालेली आहे. गुण आणि अवगुणांच्या विधानांचा विचार प्रकरण ५ मध्ये "निष्कर्ष व शिफारशी" काढतांना परामर्श घेतला आहे.

प्राध्यापकांच्या प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १६ मध्ये "संबंधित पाठ्यक्रमातील काही घटकांची आवश्यकता वाटत नसल्यास ते घटक लिहावेत" अशा स्वरुपाचा मुक्त व बंदिस्त प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला नकारार्थी प्रतिसाद मिळाला आहे. त्यांच्या मते संबंधित पाठ्यक्रमातील सर्व घटक आवश्यक आहेत.

प्राध्यापकांच्या प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १७ मध्ये "संबंधित पाठ्यक्रमासंदर्भात जर कोणते घटक आवश्यक वाटत नसतील तर त्याचे घटकानुसार विवेचन करावे" असे सांगितले होते. या प्रश्नाला प्रतिसाद काहीच मिळालेला नाही कारण अनावश्यक घटक नाहीत त्यामुळे त्या घटकांचे विवेचन करणे आवश्यक नाही.

मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमात नियोजित ९ घटकाखेरीज आणखी एका घटकाचा अंतर्भाव करावा असे अधिव्याख्यात्यांनी सूचविले आहे. तो घटक म्हणजे भाषांतरित वाङ्मय अध्यापन होय. तौलनिक अभ्यास गरजेचा आहे. त्यातून अध्यापन सुलभ होते, असे मत मांडले आहे.

शिक्षकांच्या प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १३ मध्ये "मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचा अभ्यास करताना शिक्षणशास्त्र महाविद्यालयात केलेले सरावपाठाचे अध्यापन व आता नोकरीत असतांना कराव्या लागणाऱ्या अध्यापन कार्यास उपयुक्त ठरते काय ? अशा स्वरुपाचा मुक्त व संमिश्र स्वरुपाचा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्रं.४.११] नमुद केला आहे.

सारणी ४.१३

मराठी सरावपाठांची नोकरीतील अध्यापन कार्यास उपयुक्तता

| अ.नं. | पाठ्यक्रमाचा तपशिल | शिक्षकांची संख्या होय | नाही |
|---|---|---|---|
| १. | शिक्षणशास्त्र महाविद्यालयात केलेले मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील सराव पाठांचे अध्यापन, नोकरीतील अध्यापन कार्यास आता उपयुक्त ठरते किंवा काय ? | १३० | १० |

वरील सारणीवरुन अशी माहिती मिळते की, सरावपाठांचे प्रशिक्षण कालावधीत केलेले अध्यापन आणि आता नोकरीत करावे लागणारे अध्यापन कार्य यास त्याचा उपयोग होतो म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या १३० म्हणजे ९२-८६ ९२.८६ आहे तर उपयोग होत नाही म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या १० म्हणजे ०७-१४ ७.१४ आहे.

प्रश्न क्रं.१३ ला अनुसरुन पुढील प्रश्न विचारला होता तो म्हणजे उपयुक्त ठरत असल्यास, कशा प्रकारे ? त्याविषयीचे मत विचारले होते. याला मिळालेला प्रतिसाद पुढील विधानात सारणीत [सारणी क्रं.४.१२] मांडला आहे. हा प्रश्न मुक्त स्वरुपाचा होता.

सारणी क्रमांक ४·१४

| अ·नं· | अध्यापन कार्यात सरावपाठांचा उपयोग | शिक्षक संख्या |
|---|---|---|
| १· | सरावपाठामुळे अध्यापन कार्यात धाडसी वृत्ती निर्माण होते· | १०५ |
| २· | सरावपाठांच्या अध्यापनामुळे भाषिक कौशल्य प्राप्त होते· | ११० |
| ३· | सरावपाठांच्या अध्यापनामुळे अध्यापनात विद्यार्थ्यांशी संवाद साधता येतो· | ११० |
| ४· | स्तरानुसार अध्यापन पध्दती बदलता येते· | ९० |
| ५· | अध्यापनात विविध प्रयुक्त्या, तंत्रे, शैक्षणिक साधने वापरता येतात· | १३० |
| ६· | विद्यार्थ्यांचा पूर्वानुभव लक्षात येतो· | १०५ |
| ७· | विद्यार्थ्यांना मराठी विषयावर प्रभुत्व मिळविता येतो· | १३० |
| ८· | अध्यापनाविषयीचा दृष्टिकोन समजतो· | १०२ |
| ९· | सराव पाठामुळे विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवता येते· | ११२ |
| १०· | वार्षिक पाठ्यक्रम कसा पूर्ण करावा ते कळते· | ११८ |
| ११· | अध्यापन कार्यातून मराठी विषयाची उद्दिष्टे साध्य करता येतात· | १२८ |

वरील विधानांचा परामर्श प्रकरण ५ मध्ये "निष्कर्ष व शिफारशी" करतांना घेतला आहे·

शिक्षकांच्या प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक १३ ला अनुसरून "सरावपाठाचे अध्याप अध्यापन नोकरीत उपयोगी पडत नसल्यास, का नाही" असा एक उपप्रश्न विचारला होता· या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत दिला आहे·

सारणी क्रमांक ४·१५

सरावपाठांचे अध्यापन आताच्या नोकरीत उपयुक्त नाही

| अ·नं· | अध्यापन कार्यात सरावपाठांचा उपयोग होत नाही | शिक्षकसंख्या |
|---|---|---|
| १· | नियोजित वेळेत पाठ्यपुस्तकातील पाठ्यांश पूर्ण करता येत नाही· | १०० |

| | | |
|---|---|---|
| २. | हर्बर्टच्या पंचपदीचा वापर केला तर वेळ कमी पडतो. | १०५ |
| ३. | प्रशिक्षण काळात विविध साधनांचा वापर करून सराव पाठ पूर्ण करावे लागतात. | ९० |
| ४. | पाठ्यक्रम संपविण्याच्या जबाबदारीमुळे सर्वांगीण नियोजन करता येते नाही. | १२० |
| ५. | प्रशिक्षण काळात सरावपाठ घाईगडबडीत उरकले जातात. | १३० |

वरील सारणी वरून असे माहित होते की, सरावपाठाचे अध्यापन आता नोकरीत कराव्या लागणाऱ्या अध्यापन कार्यात उपयोगी पडते पण. त्याचे प्रमाण ४.१५ च्या सारणीच्या माहितीच्या तुलनेने फारच कमी आहे.

शिक्षकाच्या प्रश्नावली मध्ये प्रश्न क्रमांक १४ मध्ये अभ्यासपूरक कार्यक्रमाचा मराठीचे अध्यापन करताना उपयोग होतो काय ? असा मुदत व बंदिस्त प्रश्न विचारला होता. यासाठी होय/नाही असा शिक्षकांना विकल्प दिला होता. सहमत असलेल्या पर्यायापुढे "बरोबर" चिन्ह करावयास सांगून नको असलेला पर्याय खोडावयास सांगितला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणी क्रमांक ४:१६ ] दिला आहे.

सारणी क्रमांक ४:१६

मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील नियोजन अभ्यासपूरक कार्यक्रमाचा अध्यापनात उपयोग

| अ.नं. | पाठ्यक्रमाचा तपशिल | शिक्षकांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १] २] | संबंधित पाठ्यक्रमात दिलेल्या सर्व अभ्यासपूरक कार्यक्रमाचा उपयोग होतो काय ? | १३० | १० (नाही) |

वरील सारणी वरून अशी माहिती मिळते की, "होय- म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या १३० म्हणजे २.८५ टक्के आहे. तर नाही म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या १० म्हणजे ७.१४ टक्के आहे. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमात दिलेल्या सर्व अभ्यासपूरक कार्यक्रमाचा मराठीत अध्यापन करताना उपयोग होतो.

प्रश्न क्रमांक १४ ला संबंधित असे आणखी तीन प्रश्न विचारले होते. क्रमश: त्यातील पहिला प्रश्न "होत नसल्यास कोणत्या उपक्रमांचा होत नाही." असा होता या प्रश्नाला प्रतिसाद शून्य मिळाला आहे. दुसरा प्रश्न "का होत नाही" असा होता. या प्रश्नाला सुद्धा शून्य प्रतिसाद मिळाला आहे. तिसरा प्रश्न आणखी कोणत्या उपक्रमाचा समावेश करावा तर हा पाठ्यक्रम अधिक सकस होईल ते सकारण सांगा" असा होता. हा प्रश्न मुक्त स्वरूपाचा होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी क्रमांक ४.१७ ] नमूद केला आहे.

सारणी क्र. ४.१७

-: नवीन अभ्यासपूरक कार्यक्रम :-

| अ.नं. | कार्यक्रमाचे नाव | सकारण |
|---|---|---|
| १ | काव्यवाचन लेखन स्पर्धा | नवनिर्मितीला प्रोत्साहन, मनोरंजन |
| २. | निबंध लेखन स्पर्धा | कल्पकतेला आव्हान देता येते. |
| ३. | पाठाविषयी चर्चा | पाठ्यपुस्तकाचे समिक्षण होते. |
| ४. | कवी परिचय | काव्याविषयी रसिकता वाटते. |
| ५. | नाट्यीकरण कला/नाट्यमंडळ | कलेचा विकास करता येईल. |
| ६. | साहित्यिकांचे व्याख्यान | नवीन साहित्याची ओळख करून घेता येईल. |
| ७. | कथाकथन लेखन<br>सारांश लेखन | विचार प्रवर्तनाला चालना |

वरील सारणीवरून असा निष्कर्ष काढता येतो की, अभ्यासपूरक कार्यक्रमात काही नवीन उपक्रमांचा समावेश करावा. याचा विचार प्रकरण ५ मध्ये केलेला आहे.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीत "क" विभागा मध्ये प्रश्न क्र. १८ मध्ये "पाठ्यक्रमात दिलेल्या सर्व अभ्यासपूरक कार्यक्रमांचा समावेश करणे आवश्यक आहे.

का असा मुक्त व बंदिस्त स्वरूपाचा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला दोन पर्याय दिलेले होते. या प्रश्नातील योग्य पर्याय ठेवून अयोग्य पर्याय खोडावयास सांगितला होता. या प्रश्नाला "होय" "नाही" या स्वरूपात मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी क्र.४:१५ ] नमुद केला आहे.

सारणी क्र. ४.१८

| | पाठ्यक्रमातील अभ्यासपूरक कार्यक्रम | | |
|---|---|---|---|
| अ.नं. | अभ्यासपूरक कार्यक्रमाचा तपशिल | अधिव्याख्यात्यांची संख्या | |
| | | होय | नाही |
| १] | मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमात सर्व अभ्यासपूरक कार्यक्रमाचा समावेश करणे आवश्यक आहे काय ? | १५ | ० |

वरील सारणीवरून अशी माहिती मिळते की, सर्व अधिव्याख्यात्यांच्या मते मराठीला सर्व अभ्यासपूरक कार्यक्रमाची गरज आहे. म्हणजे १५ अधिव्याख्यात्यांते "होय" या स्तंभात १०० टक्केवारी मिळाली आहे.

१८ नंबरच्या प्रश्नाला पूरक असे ६ उपप्रश्न विचारले होते. त्यातील पहिला प्रश्न नाही. या पर्यायावर अवलंबून होता. "नसल्यास" कोणत्या कार्यक्रमाचा समावेश केला नाही तरी चालेल त्याची खाली नावे द्या". त्यातील दूसरा प्रश्न" या अभ्यासपूरक कार्यक्रमाचा समावेश केला नाही. तरी चालेल असे आपल्याला का वाटते ? असा विचारला होता. या प्रश्नाना प्रतिसाद मिळाला आहे. तिसरा प्रश्न "या व्यतिरिक्त आणखी कोणत्या कार्यक्रमाचा समावेश करावा ते सांगा" अशा स्वरूपाचा मुक्त व संमिश्र स्वरूपाचा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्रमांक ४.१६ ] दिला आहे. तसेच चौथा प्रश्न " वरील उपक्रमाचा समावेश का करावा ? ते उपक्रमानुसार लिहा" अशा मुक्त स्वरूपात होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी क्र. ४.१६ ] मधील दुसऱ्या स्तंभात नमुद केला आहे.

सारणी क्र. ४.१६

| अ.नं. | अभ्यासपूरक इतर उपक्रम | कारणमिमांसा |
|---|---|---|
| १] | बहुभाषातील रूपांतरित वाङ:मयाचा | राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यास मदत होईल. |
| २] | राष्ट्रीय एकात्मतेवर उपक्रम | |
| २] | एकांकिका - इतर प्रांतांपर्यंत पोहोचविणे. | आपली मराठी व इतर भाषा यांचा समन्वय आज अत्यावश्यक आहे. |
| ३] | अभिनय स्पर्धा घेणे | संभाषण चातुर्य समजले. |
| ४] | हिंदी प्रमाणे मराठी दिन साजरा करणे | मराठी भाषेचे महत्व कळेल. |
| ५] | मराठीची वर्गवार शालेय निहाय काल दरम्यान साहित्य संमेलने भरवावीत. | साहित्याची मराठीच्या शिक्षकास पूर्णता जाणार नाही. |
| ६] | भाषिक कोडी, भाषिक खेळ घेणे | शब्दनिर्मिती प्रक्रिया समजण्यासाठी |
| ७] | शब्दकोशांचा वापर-२०० शब्द त्यांची व्युत्पत्ती द्यावी. | |
| ८] | नियतकालिक काढावे.[जाहिराती, लेख] | प्रशिक्षणार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो. व समाजाशी घनिष्ठ संबंध येतो. |
| ९] | वाचनमंडळ तयार करणे. | रसग्रहण क्षमतेचा विकास करता येतो. |

वरील सारणीचा विचार प्रकरण ५ मध्ये निष्कर्ष व शिफारशी काढताना केलेला आहे.

शिक्षकांच्या प्रश्नावली मध्ये प्रश्न क्रमांक १५ अध्यापन साहित्यावर विचारला होता. या प्रश्नात दृक श्राव्य साधने या उपघटकामध्ये त्यांची केवळ तात्त्विक माहिती दिली जाते की प्रत्यक्षात त्याचा वापर कसा करावा, हे प्रत्यक्षात दाखविले जाते.

[फिल्मस्ट्रिप्स, फ्लॅशकार्ड्स, लिंग्वाफोन] या प्रश्नाला तात्त्विक व प्रात्यक्षिक असे दोन पर्याय दिले होते. सहमत असलेला पर्याय ठेवून नको असलेला पर्याय खोडावयास सांगितला होता. हा प्रश्न मुक्त व संमिश्र स्वरूपाचा होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [४.१७] नमुद केला आहे.

सारणी क्रमांक ४.२०

अध्यापन साहित्यामधील दृकश्राव्य साधने

| अ.नं. | पाठ्यक्रमाचा तपशिल | दृक-श्राव्य साधने | |
|---|---|---|---|
| | | तात्विक | प्रात्यक्षिक |
| १. | दृक-श्राव्य साधनांची माहिती केवळ तात्त्विक भागाने दिली जाते की प्रत्यक्षात त्याचा वापर कसा करावा हे प्रत्यक्षात दाखविले जाते ? | १२५ | १५ |

सारणीवरून अशी माहिती मिळते की, केवळ अध्यापन साहित्याची तात्त्विक माहिती दिली जाते असे मत असणाया शिक्षकांची संख्या १२५ म्हणजे ८९.२८ टक्के आहे तर अध्यापन साहित्याची प्रात्यक्षिके करून दाखविली जातात असे म्हणणा-या शिक्षकांची संख्या फक्त १५ म्हणजे १०.७१ टक्के आहे. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की अध्यापन साहित्याची तात्त्विक माहिती देणा-यांचे प्रमाण प्रात्यक्षिक करून दाखविणा-या संख्येपेक्षा अधिक आहे.

प्रश्न क्रमांक १५ ला अनुसरून आणखी २ प्रश्न शिक्षकांना विचारले होते. त्यातील पहिला प्रश्न "याशिवाय आणखी कोणत्या अध्यापन साहित्याचा समावेश या पाठ्यक्रमास करावा ? असा होता. हा प्रश्न शिक्षकांना मुक्त स्वरूपात विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्रं.४.१८] नमुद केला आहे. दुसरा प्रश्न वरील अध्यापन साहित्याचा कशासाठी पाठ्यक्रमात समावेश करावा" असा विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत

[सारणी क्रं.४.१८] नमुद केला आहे.

प्रश्न क्रं.१५ मधील दोन्ही उपप्रश्नांचा मिळालेला प्रतिसाद [सारणी क्रमांक ४.१८ मध्ये] एकत्रित नमुद केला आहे.

सारणी क्रमांक ४.२१

पाठ्यक्रमात समाविष्ठ असलेल्या अध्यापन साहित्याखेरीज इतर अध्यापन साहित्य व कारणमिमांसा :

| अ.नं. | अध्यापन साहित्य | कशासाठी |
|---|---|---|
| १. | स्लाईड शो दाखवावेत | नवीन लेखक,कवींची प्रत्यक्ष माहिती मिळते, परिचय. |
| २. | ओहर हेड प्रोजेक्टर | चित्राद्वारे माहिती मिळवता येईल. |
| ३. | शिक्षकनिर्मित साधने | प्रशिक्षणार्थ्यांना प्रवृत्त करता येते. |
| ४. | परिसरात उपलब्ध होणारी साधने | प्रशिक्षणार्थ्यांना साधनांचा संग्रह करण्याची आवड निर्माण होते. |
| ५. | आत्मचरित्रपर लेख | आदर्श संस्कार घडविण्यासाठी |
| ६. | पौराणीक, दुर्मिळ वस्तुंचे प्रदर्शन | मराठी विषयांशी संबंधित बाबींचा अभ्यास करता येतो. |
| ७. | शैक्षणिक सहली | भाषेतील फरक अभ्यासता येतो. |

वरील सारणीवरुन अशी माहिती मिळते की, मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमात समाविष्ठ असलेल्या अध्यापन साहित्याखेरीज स्लाईड शो, ओहर हेड प्रोजेक्टर, शिक्षकांनी स्वत: तयार केलेली साधने, परिसरात उपलब्ध होणारी साधने, आत्मचरित्रपर लेख, पौराणीक, दुर्मिळ वस्तुंचे प्रदर्शन, शैक्षणिक

सहली या अध्यापन साहित्याचा नव्याने अंतर्भाव केल्यास अध्ययन अध्यापन प्रभावी होईल.

शिक्षकांच्या प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक १६ मध्ये "मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमात समाविष्ठ असणा-या अध्यापन पद्धतीपैकी कोणकोणत्या अध्यापन पद्धतीचा उपयोग प्रत्यक्षात तुम्ही करता नांवे द्या" असा मुक्त व संमिश्र स्वरुपाचा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्रं.४.१९] नमुद केला आहे.

सारणी क्रमांक ४.२२

संबंधित पाठ्यक्रमातील अध्यापन पद्धती

| अ.नं. | अध्यापन पद्धती | शिक्षकांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | | टक्केवारी |
| १. | कथन | १२० | ८५.७१ |
| २. | व्याख्यान | २५ | १७.८५ |
| ३. | परिसंवाद | १०० | ७१.४२ |
| ४. | उद्गामी-अवगामी | ११५ | ८२.१४ |

वरील सारणीवरुन अशी माहिती मिळते की कथन अध्यापन पद्धतीचा उपयोग करणा-या शिक्षकांची संख्या १२० आहे. तर उद्गामी-अवगामी अध्यापन पद्धतीचा उपयोग करणा-या शिक्षकांची संख्या ११५ आहे. परिसंवाद अध्यापन पद्धतीचा वापर करणा-या शिक्षकांची संख्या १०० आहे आणि व्याख्यान अध्यापन पद्धतीचा वापर करणा-या शिक्षकांची संख्या २५ आहे. या आकडेवारीवरुन असा निष्कर्ष निघतो की कथन अध्यापन पद्धतीचा उपयोग सर्वाधिक केला जातो.

शिक्षकांच्या प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १७ मध्ये "जून १९९४ पासून माध्यमिक स्तरावर मराठी विषयाचा जो पुर्नरचित अभ्यासक्रम सुरु आहे. त्यासाठी हा मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम उपयुक्त आहे का ? या प्रश्नासाठी "होय/नाही"

असा पर्याय दिला होता. योग्य पर्याय ठेवून नसो असलेला पर्याय खोडाव्यास सांगितला होता. हा प्रश्न मुक्त स्वरूपाचा होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्र.४.२३] नमुद केला आहे.

## सारणी क्रमाक ४.२३

### पुर्नरचित अभ्यासक्रमासाठी पाठ्यक्रमाची उपयुक्तता

| अ.नं. | पाठ्यक्रमाचा तपशिल | शिक्षकसंख्या होय | नाही |
|---|---|---|---|
| १. | १९९२ पासून माध्यमिक स्तरावर मराठी विषयाचा पुर्नरचित अभ्यासक्रम सुरु आहे. त्यासाठी मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम उपयुक्त आहे का ? | ८० | ६० |

वरील सारणीवरुन अशी माहिती मिळते की, पुर्नरचित अभ्यासक्रमासाठी मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम उपयुक्त आहे असे म्हणणा-या शिक्षकांची संख्या ८० म्हणजे ५७.१४ टक्के आहे आणि पुर्नरचित अभ्यासक्रमासाठी मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम उपयुक्त ठरत नाही असे म्हणा-या शिक्षकांची संख्या ६० म्हणजे ४२.८५ टक्के आहे. वरील आकडेवारीवरुन असा निष्कर्ष काढता येतो की, मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम १९९४ पासून माध्यमिक स्तरावर चालू असलेल्या पुर्नरचित अभ्यासक्रमास उपयुक्त आहे.

शिक्षकांच्या प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १८ मध्ये "मराठी हा विषय शिकवित असतांना हा पाठ्यक्रम कितपत उपयुक्त झाला आहे, असे वाटते" त्यापुढे बरोबर [✓] अशी खुण करावयास सांगितली होती आणि अत्युत्कृष्ठ, उत्कृष्ठ, उत्तम, मध्यम, कनिष्ट अशी पंचबिंदूश्रेणी दिली होती. हा प्रश्न मुक्त स्वरूपाचा होता या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्रमांक ४.२१] नमुद केला आहे.

सारणी क्रमांक ४·२४

मराठी विषय शिकवितांना पाठ्यक्रमाची उपयुक्तता

| अ·नं· | पाठ्यक्रमाचा तपशिल | अत्युत्कृष्ट | उत्कृष्ट | उत्तम | मध्यम | कनिष्ट |
|---|---|---|---|---|---|---|
| १· | मराठी हा विषय शिकवित असतांना हा पाठ्यक्रम कितपत उपयुक्त झाला आहे ? | ६० | ५० | ३० | ० | ० |

वरील सारणीवरून अशी माहिती मिळते की "अत्युत्कृष्ट" या स्तंभात ६० शिक्षकांनी म्हणजे ४२·८५ टक्के,"उत्कृष्ट" या स्तंभात ५० शिक्षकांनी म्हणजे ३५·७१ टक्के,"उत्तम" या स्तंभात ३० शिक्षकांनी म्हणजे २१·४२ टक्केबरोबर असे चिन्ह केले आहे·

यावरुन हा संबंधित अभ्यासक्रम उत्कृष्ठ आहे· असा निष्कर्ष काढता येतो·

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीमध्ये "ड" विभागामध्ये "सद्यस्थितीला आवश्यक पण न आलेला असा अनिवार्य भाग" यामध्ये १९ नंबरचा प्रश्न होता· तो "मराठी विषय माध्यमिक स्तरावर शिकविण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांना विविध अध्यापन पद्धतीचा वापर करण्यासाठी हा पाठ्यक्रम पुरेसा आहे का ?" असा मुक्त व संमिश्र स्वरूपाचा होता· या प्रश्नासाठी "होय/नाही" असे दोन पर्याय दिले होते· सहमत असलेल्या पर्यायापुढे "बरोबर" चिन्ह कराव्यास सांगितले होते· या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्रं·४·२२] नमुद केला आहे·

सारणी क्रमांक ४·२५

माध्यमिक स्तरावर शिकविण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांना विविध अध्यापन पद्धतींचा वापर करण्यासाठी पाठ्यक्रमाची उपयुक्तता

| अ·नं· | पाठ्यक्रमाचा तपशिल | प्राध्यापक संख्या होय | नाही |
|---|---|---|---|

| अ.नं. | पाठ्यक्रमाचा तपशिल | अधिव्याख्यात्याची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १. | माध्यमिक स्तरावर शिकविण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांना विविध अध्यापन पध्दतींचा वापर करण्यासाठी हा पाठ्यक्रम पुरेसा आहे का ? | १३ | ०२ |

वरील सारणीवरुन असे माहित होते की, प्रशिक्षणार्थ्यांना विविध अध्यापन पध्दतींचा वापर करण्यासाठी हा पाठ्यक्रम पुरेसा आहे, असे म्हणणा-या संख्या जास्त १३ म्हणजे ८६.६६ टक्के आहे तर हा पाठ्यक्रम संबंधित बाबींसाठी उपयुक्त नाही म्हणणा-या अधिव्याख्यात्यांची संख्या कमी ०२ म्हणजे १३.३३ टक्के आहे.

याच प्रश्नाशी संबंधित असा प्रश्न १९.१ मध्ये विचारला होता तो म्हणजे हा पाठ्यक्रम अध्यापन पध्दतींच्या दृष्टीने उपयुक्त नसल्यास का नाही ? त्याची कारणे द्या" असा मुक्त व संमिश्र स्वरुपाचा होता. या प्रश्नात दोन अधिव्याख्यात्यांनी आपली मते मांडली आहेत. ती पुढील विधानात नमुद केली आहेत.

१] सध्या ज्या आंतरराष्ट्रीय घडामोडी आशय स्वरुपात पुढे येत आहेत. त्यासंबंधी अध्यापन पध्दती मध्येही आशयानुसार परिवर्तन व सुयोग्य बदल होणे आवश्यक आहे.

२] भाषांतरित व रुपांतरित वाङ्मयाच्या अभ्यासाचा विचार होणे आवश्यक आहे.

या कारणांचा विचार प्रकरण ५ मध्ये "निष्कर्ष व शिफारशी" करताना केलेला आहे.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक २० मध्ये "काळाच्या गरजेनुसार हा पाठ्यक्रम अनुरुप असा वाटतो का ?" असा मुक्त व संमिश्र प्रश्न अधिव्याख्यातांना विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील विधानाद्वारे व्यक्त केला आहे.

१] काळाच्या गरजेनुसार पाठ्यक्रमात पुरेशी भर टाकणे आवश्यक व अपरिहार्य आहे. नवीन पाठ्यक्रमासंबंधित असलेला विचार पाठ्यक्रमात समाविष्ठ करणे अगत्याचे आहे.

२] पाठ्यक्रमात नाविन्य उमटले पाहिजे. भाषा नवस्वरूप स्पष्ट करावे. २१ व्या शतकाकडे जाणा-या जागतिक घटना व भारतातील घटना, शोध, प्रयत्न यांचे नवे प्रतिबिंब उमटण्यासाठी अद्यावतपणा पाहिजे. यासाठी नवीन भाषिक प्रयोगशाळा असावी.

३] ऐय, फक्त नवीन मूल्यमापनाच्या अद्यावत पद्धतींचा अवलंब व त्याचा कृती कार्यक्रम आखला आहे.

४] नवीन शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक शाळेतील अभ्यासक्रम बदलण्यात आलेला आहे तो पाठ्यक्रमाच्या दृष्टीने योग्य वाटतो.

या विधानांचा विचार "निष्कर्ष व शिफारशी" काढताना केला आहे.

प्रश्न क्रमांक २१ शी संबंधित पुढील उपप्रश्न होता "नसल्यास, आणखी कोणता भाग त्यात समाविष्ट करावा ?" असा मुक्त स्वरूपाचा प्रश्न होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढे नमुद केला आहे.

१] नवनवीन शैक्षणिक तंत्राचा, साधनांचा मराठी अध्यापनात प्रभावी उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने पाठ्यक्रमात बदल करावा.

२] काही अध्यापन पद्धतीवर नव्याने सविस्तर लेखन केले पाहिजे. अध्यापन पद्धती व दैनंदिन शालेय वातावरण समन्वय यावर विचार केला पाहिजे. उदा: ब्रेन स्ट्रॉम मेथड वर मराठीत लेखन कमी आहे. इक्लेक्टिव्ह मेथडची माहिती अपुरी आहे.

३] मराठी भाषेतील नवप्रवाहास वाव देणे आवश्यक आहे.

वरील विधानांचा विचार निष्कर्ष व शिफारशी करतांना केलेला आहे.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीत २१ नंबरचा प्रश्न "अध्यापन पद्धती" विषयी होता. त्यामध्ये "प्रशिक्षणार्थ्यांना वेगवेगळ्या अध्यापन पद्धतीतून पाठ घेण्याविषयी हा पाठ्यक्रम न्याय देतो, असे तुम्हांस वाटते काय ?" असा प्रश्न विचारला होता याला "होय/नाही" असे दोन पर्याय दिले होते. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्रमांक ४.२३] नमुद केला आहे.

सारणी क्रमांक ४.२६

मराठी पाठ्यक्रमातील अध्यापन पद्धतींची उपयुक्तता

| अ.नं. | पाठ्यक्रमाचा तपशिल | प्राध्यापक संख्या - होय | नाही |
|---|---|---|---|
| १. | प्रशिक्षणार्थ्यांना वेगवेगळ्या अध्यापन पद्धतीतून पाठ घेण्याविषयी हा पाठ्यक्रम न्याय देतो का ? | १२ | ०३ |

वरील सारणीवरुन अशी माहिती मिळते की "होय" म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांची संख्या ही "नाही" म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या संख्येपेक्षा अधिक आहे.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक २२ मध्ये "माध्यमिक उच्च माध्यमिक शाळांमधील मराठी विषयाच्या पुर्नरचित अभ्यासक्रमानुसार हा पाठ्य-नुसार हा पाठ्यक्रम उपयुक्त आहे का ?" अशा स्वरुपाचा संमिश्र प्रश्न होता. मध्ये "होय/नाही" पर्याय दिलेले होते आणि "होय" पर्याय असल्यास कशाप्रकारे ठरले होते तर त्याचप्रमाणे "नाही" पर्याय असल्यास का नाही त्याचे उत्तर

नमुद करण्यास सांगितले होते. यापैकी "होय" पर्यायाला जास्त १४ म्हणजे ९३.३३ टक्के प्रतिसाद मिळाला तर "नाही" पर्यायाला १ म्हणजे ०.७/९४ प्रतिसाद मिळाला आहे. "होय" प्रतिसादाखाली "कशाप्रकारची" उपयुक्तता पुढे नमुद केली आहे.

१] प्रशिक्षणार्थ्यांच्या ज्ञानात्मक व बौध्दिक विकासावरच भर देण्याचा विचार होतो.

२] पुर्नरचित अभ्यासक्रमातुन विद्यार्थ्यांच्या विविध कृती प्रवृत्ती जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे उन्नयन केले आहे. मूल्यसंवर्धनाला महत्त्व दिले आहे.

३] पुर्नरचित अभ्यासक्रमाचा भाग मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाच्या उद्दिष्टांनी सफल होतो.

४] अध्यापनात जिवंतपणा येतो.

पुर्नरचित अभ्यासक्रमाला हा पाठ्यक्रम उपयुक्त पडत नाही असे म्हणणा-या अधिव्याख्यात्यांनमुद केलेली मते खाली दिली आहेत.

१] हा पाठ्यक्रम ब-याच जुन्या बाबींना पुढे नेतो तो पॅचवर्क केल्यासारखा वाटतो. नवीन अभ्यासा संदर्भात ती रेल्वेला डबे जोडल्यासारखा वाटतो.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीत "इ" भागामध्ये मराठी अध्यापन पध्दतीच्या तात्त्विक पाठ्यक्रमाचे सामर्थ्य वाढविणे या संदर्भात प्रश्न दिले होते. त्यातील २३ नंबरचा प्रश्न असा होता की, "मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाबाबत आपण समाधानी आहात काय ?" याला "होय नाही" असे दोन पर्याय दिले होते. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्रमांक ४.२५] नमुद केला आहे. तसेच या प्रश्नाला पुरक प्रश्न "नसल्यास त्याची कारणे थोडक्यात द्यावी" असा मुक्त स्वरूपात दिला होता याला प्रतिसाद मिळालेला पुढील सारणीत

दिला आहे [सारणी क्रमांक ४•२५]

सारणी क्रमांक ४•२७

| अ•नं• | मराठी पाठ्यक्रमाचा तपशिल | होय | नाही | कारणे |
|---|---|---|---|---|
| १• | मराठी पाठ्यक्रमाबाबत आपण समाधानी आहात काय ? | १२ | ३ | पाठ्यक्रम नव्या आंतरराष्ट्रीय संदर्भात पाहिजे• "प्रत्यक्ष शाळेत या अध्यापन पद्धतीने शिकविताना येणा-या अडचणी व त्यावर उपाय याचा विचार व्हावा"• "पाठ्यक्रमात दैनंदिन जीवनात येणा-या अडचणींचा परामर्श घेतला गेला नाही• *भाषा हा एक सखोलपणे अभ्यासण्याचा विषय असल्याने त्यादृष्टीने त्याची रचना होणे आवश्यक आहे• केवळ पुस्तकी स्वरूप ठेवणे गैर आहे• * गुणात्मक तत्वावरच अभ्यासक्रमाची रचना असावी• *अध्यापनात अधिक सूक्ष्मता येणे आवश्यक • * मूल्यशिक्षणाचे संदर्भात उपयुक्त अध्यापन पद्धती कोणती याबाबत निश्चित मार्गदर्शन नाही• |

| अ.नं. | मराठी पाठ्यक्रमाचा तपशिल | होय | नाही | कारणे |
|---|---|---|---|---|
| | | | | *मराठी भाषेचा पाठ्यक्रम सर्व अध्यापन पध्दतींच्या अभ्यासास उपयुक्त नाही.<br>*पाठ्यक्रमाला मर्यादा आहेत. उदा.सर्व संबंधित घटकांचा परामर्श घेता येत नाही. |

वर नमुद केलेली कारणे योग्य आहेत. या कारणांचा विचार प्रकरण पाच मध्ये केला आहे.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक २४ मध्ये "मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन करण्या संबंधी" मुक्त प्रश्न विचारला होता यामध्ये "होय/नाही" असे दोन पर्याय दिले होते. उपप्रश्नात "नसल्यास त्यात कोणत्या सुधारणा करणे आवश्यक आहे" ते विचारले होते. वरील प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत[सारणी क्रमांक ४.२६] नमुद केला आहे.

सारणी क्रमांक ४.२८

मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन

| अ.नं. | पाठ्यक्रमाचा तपशिल | होय | नाही | सुधारणा |
|---|---|---|---|---|
| १. | मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन करण्यास शिक्षकांना हा अभ्यासक्रम समर्थ करतो काय ? | १२ | ०३ | समर्थ बनविण्यास सामर्थ्याची गोडी अनुभवली पाहिजे पचविली पाहिजे.<br>शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण देणे विषय,आशय, तंत्रे या सर्वांची दर तीन वर्षांनी पुर्नरचना करणे.<br>अनुभवाची गरज आहे. |

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक २५ मध्ये "काळाच्या गरजेनुसार हव्या असलेल्या शिक्षकांची निर्मिती या पाठ्यक्रमाने होईल का ?" असा मुक्त व संमिश्र प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला "होय/नाही" असे द्विपर्याय दिले होते. अधिव्याख्यात्यांना सहमत असलेल्या पर्यायासमोर "बरोबर" खूण करावयास सांगितली होती. त्यापुढील उपप्रश्न काळाच्या गरजेनुसार हव्या असलेल्या शिक्षकांची निर्मिती या पाठ्यक्रमाने होत नसल्यास त्याची कारणे विचारली होती. हा उपप्रश्न मुक्त स्वरूपाचा होता. या दोन्ही प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्रमांक ४.२७] नमुद केले आहे.

सारणी क्रमांक ४.२९

काळाच्या गरजेनुसार हव्या असलेल्या शिक्षकांची निर्मिती

| अ.नं. | पाठ्यक्रमाचा तपशिल | होय | नाही | नसल्यास कारणे |
|---|---|---|---|---|
| १. | काळाच्या गरजेनुसार हव्या असलेल्या शिक्षकांची निर्मिती या पाठ्यक्रमाने होईल का ? | ११ | ०४ | * अध्यापन ही एक कला आहे.<br>* काळ बदलत असतो त्याप्रमाणे पाठ्यक्रमात बदल होणे आवश्यक.<br>* शिक्षकांचे अष्टपैलुत्व सिध्द होण्यासाठी आणखी शैक्षणिक अनुभव शोधून ते विवेचित करावे लागतील.<br>* नविन काळाच्या प्रवाहातील प्रश्न सोडविण्यास शिक्षक समर्थ बनत नाहीत. |

वरील सारणीच्या माहितीवरून असे सांगता येईल की, नवीन काळाच्या गरजेनुसार पाठ्यक्रमात बदल करून नविन शैक्षणिक अनुभवांची भर घालणे आवश्यक आहे. काळाच्या गरजेनुसार हव्या असलेल्या शिक्षकांची निर्मिती या पाठ्यक्रमाने "होईल" असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांची संख्या ११ म्हणजे ७३.३३ टक्के आणि "नाही" म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांची संख्या ०४ म्हणजे २६.६६

टक्के आहे. यावरुन हे सिध्द होते की, पाठ्यक्रम शिक्षक निर्मितीत सामर्थ्यशाली आहे.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीमध्ये तात्त्विक भागावरील शेवटच्या प्रश्न क्रमांक २६ मध्ये अन्य उपयुक्त माहिती देण्याच्या अनुषंगाने विचारला होता. हा प्रश्न मुक्त स्वरूपाचा होता. या प्रश्नात तात्त्विक भागात न विचारलेला पण संशोधन कार्यास उपयुक्त भाग देण्यास सांगितला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढे नमुद केला आहे.

नमुद केलेली विधाने पुढे देण्यात आली आहेत.

१. मराठी पाठ्यक्रमाचा विचार करताना मूल्यसंवर्धनाला महत्व दयावे. त्याची योजना त्यामध्ये करावी.

२. तत्वाचा भाग व्यवहाराशी सांगड घालणारा पाहिजे. प्रत्यक्ष शिकविताना तत्व अमलात आणताना काटेकोरपणा शक्य नसतो, भावनिक काल्पनिक वाङ्‌मयाच्या अध्यापनाच्यावेळी हा तर्क तत्वाचा भाग पूर्णत: अंमलात आणताना अडचणी येतात.

पाठ्यक्रमांच्या घटकांची रचना व अनुक्रम विद्यार्थ्यांच्या त्या त्या त्या शाखांतील मराठीच्या दैनंदिन अध्यापनाच्या संदर्भात तयार करावा.

३. पाठ्यक्रमा बरोबर अधिव्याख्यात्यांनी आपल्या दैनंदिन आचरणात आदर्श दाखविला पाहिजे. आदर्श शिक्षकच आदर्श विद्यार्थी घडवू शकतो. त्यामुळे प्राध्यापकांनी, अध्यापकांनी आपल्या जवळील दुर्गुण दूर केले पाहिजे. वेळेचे भान ठेवले पाहिजे.

४. मराठी शिक्षकांनी आपला व्यावसायिक विकास साधावयाचा असल्यास सद्याची प्रभावशाली प्रसार माध्यमे आपल्या अध्यापनात उपयोगात आणली पाहिजेत.

५. मराठी पाठ्यक्रम हा शहरी व ग्रामीण याबाबतीत परिसराचा अभ्यास करणारा असावा. सुसंवाद साधणारा पाहिजे. "पाठ्यक्रमातील घटक दुवे जोडणारे, अभ्यासक्रमातील जुळवाजुळव करणारे, क्रमप्राप्त असावेत.

प्राप्त ज्ञानाची व्यावहारिक ज्ञानाशी जवळीक साधून व्यासंग निर्माण केला पाहिजे.

५ **मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक भागाची माहिती :**

शिक्षकांच्या प्रश्नावली मध्ये "मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचे प्रात्यक्षिक कार्य" या भागा मध्ये प्रश्न क्रमांक १९ पासून २३ पर्यन्तचे प्रश्न होते. त्यातील प्रश्न क्रमांक १९ मध्ये प्रात्यक्षिक कार्याच्या फायद्या संबंधी प्रश्न होता हा प्रश्न पंचबिंदूश्रेणीत [फार, फारसा नाही, थोडासा फायदा झाला, अजिबात झाला नाही ] दिला होता. तसेच या प्रश्नाशी संबंधित दोन उपप्रश्न विचारण्यात आले होते. "असल्यास कसा" आणि नसल्यास त्यात कोणती सुधारणा करावी ? असा स्वरूपाचे संमिश्र प्रश्न होते. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी क्र.४.३० ] दिलेला आहे.

सारणी क्र. ४.३०

प्रात्यक्षिक कार्याचा फायदा

| अ.नं. | फार | फारसा नाही | थोडासा | अजिबात नाही | असल्यास कसा | सुधारणा |
|---|---|---|---|---|---|---|
| १] | ७० | २० | ५० | | वार्षिक नियोजनाचे कौशल्य,<br>अध्यापनाचे कौशल्य प्राप्त झाले,<br>वाचणी कशी द्यावी ते कळले.<br>स्वयंअध्ययनाला चालना गुणदान तक्ता तयार करता येतो.<br>गद्य व पद्याचे वर्गीकरण करता येते.<br>विषयाचा तात्त्विक भाग कळतो.<br>विषयक घटक समजून येतो.<br>घटकनियोजन, हेतू विश्लेषण करता येते.<br>हस्तलिखीतमुळे अक्षर सुधारते.<br>भित्तीपत्रीकामुळे अभिवृत्ती वाढते.<br>अध्यापनातील बारकावे कळतात. | प्रात्यक्षिक कार्याच्या बोजामुळे अध्यापनावर वाईट परिणाम होतो.<br>विद्यार्थ्यांना कंटाळा येतो.<br>कृती फायदेशीर हवी.<br>प्रात्यक्षिकाचे स्वरूप मर्यादा बारकावे स्पष्ट असावेत<br>व्यावहारिक उपयोग असावा.<br>अवांतर लेखन नको. |

वरील सारणीवरून अशी माहिती मिळते की, प्रात्यक्षिक कार्याचा "फार" फायदा झाला म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या ७० म्हणजे ५०.०० टक्के आहे. फारसा नाही" म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या २० म्हणजे १४.२८ % आहे. आणि "थोडासा" फायदा झाला असे म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या ५० म्हणजे ३५.७१ टक्के आहे. यावरून असे म्हणता येते की प्रात्यक्षिक कार्याचा अजिबात उपयोग नाही असे म्हणणारे शिक्षक नाहीत तर प्रात्यक्षिकाचा "फार" उपयोग होतो असे म्हणणारे शिक्षक अधिक आहेत.

अधिव्याख्यात्याच्याप्रश्नावली मध्ये तिसऱ्या भागात प्रात्यक्षिक कार्यावर ७ वेगवेगळ्या भागात १ ते १७ प्रश्न विचारले होते. यातील काही प्रश्न मुक्त स्वरूपाचे होते तर काही प्रश्न संमिश्र स्वरूपाचे होते. प्रात्यक्षिक कार्यातील पहिला भाग मराठी अध्यापन पद्धती मधील प्रात्यक्षिक कार्याच्या सामग्रीचे संघटन असा होता. यातील पहिला प्रश्न अध्यापन पद्धतीच्या माहितीवर आणि मार्गदर्शन व दिग्दर्शन यावर होता. अध्यापन पद्धती या प्रात्यक्षिक कार्यात आणाव्यात काय ? आणि आणावयाच्या असल्यास, त्या कशा प्रकारे आणता येतील ? असा प्रश्न होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद, नमुद केलेली विधाने पुढे दिली आहेत.

१. होय, त्याबाबतचा विचार वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून केला पाहिजे. प्रत्यक्षात प्रशिक्षणार्थ्यांना विविध अध्यापन साहित्य हाताळावयास दिले पाहिजे.

२. होय, प्रत्यक्ष अध्यापकानेच यामध्ये रस दाखविला पाहिजे.

३. होय, सैद्धान्तिक स्वरूपाबरोबर अधिव्याख्यात्याने प्रत्यक्ष वर्गात मार्गदर्शन व दिग्दर्शन करून दाखवावे.

४. होय , विविध प्रसंगाच्या व स्पर्धांच्या माध्यमातून ते प्रात्यक्षिक कार्यात आणता येईल.

५. होय, प्रात्यक्षिक कार्यावर अधिक भर दयावा.

६. होय, दैनंदिन अध्यापनातून साध्य करता येईल.

७. होय, विविध स्वरूपाचा तात्त्विक भाग प्रात्यक्षिकात आणावयाचा प्रात्यक्षिकात आणता येईल असे नाही.

८. सैद्धान्तिक भाग व प्रात्यक्षिक भाग याची सांगड घालून

९. सराव पाठांची संख्या वाढवावी अनुभवी व ख्यातनाम शिक्षकांचे पाठांचे दिग्दर्शन असावे. सराव पाठांचे नियोजन करताना विविध प्रकारच्या पाठांची योजना असावी.

वरील अनेक विधानाची असा अर्थ होतो की, विविध अध्यापन पद्धतींचा केवळ तात्त्विक माहिती न देता मराठी विषयांशी संबंधित प्रत्यक्षात त्या अध्यापन पद्धती कशा वापराव्याच्या याचे दिग्दर्शन व मार्गदर्शन देणे. आवश्यक आहे असे मराठी **अधिव्याख्यात्यांचे मत आहे.**

**अधिव्याख्यात्यांच्या** प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक २ मध्ये "पाठ्यक्रमातील क्रमबद्धता प्रात्यक्षिक कार्याशी सांगड घालण्याच्या दृष्टीने कशी आहे ? अशा स्वरूपाचा मुक्त व संमिश्र प्रश्न विचारला होता या प्रश्नाला योग्य व अयोग्य असे दोन पर्याय दिले होते. त्यापैकी सहमत असलेल्या पर्यायाला "बरोबर" चिन्ह करावयास सांगितले होते. तसेच २ नंबरच्या प्रश्नांशी संबंधित आणखी ४ उपप्रश्न विचारले होते. त्यातील पहिला प्रश्न "योग्य असल्यास" कशा प्रकारे विचारले होते, प्रश्न अयोग्य असल्यास कोणत्या क्रमाने असावी, असे तुम्हास वाटते ते नमुद करावयास सांगितले होते. तिसऱ्या प्रश्नात वरील प्रमाणे क्रम असावा असे का वाटते त्याची कारणे नमद करावयास सांगितली होती आणि चौथ्या उपप्रश्नात यापेक्षा वेगळे उत्तर द्यावयाचे झाल्यास ते देण्यास सांगितले होते.

वरील पाचही प्रश्नांना मिळालेला प्रतिसाद खालील सारणीत नमूद केला आहे. [सारणी क्र. ४.३१ ]

सारणी ४ : ३१

पाठ्यक्रमातील प्रकरणाची क्रमबद्धता

| योग्य | कशा प्रकारे | अयोग्य अयोग्य | कारणे |
|---|---|---|---|
| ११ | पालकी विचारात घेऊन पाठ्यक्रमाची मांडणी केली आहे.<br>पाठ्यक्रमाची चढती कमान आहे.<br>आशययुक्त अध्यापनाच्या कृतिसत्राशी उपयुक्त आहे. | ०४ | मराठीच्या अंगोपांगाचे अध्यापन ५ नंबरला असावे कारण तात्त्विक भागाला एक वाक्यता येईल.<br>मराठीचा शिक्षक, उद्दिष्टे, पाठ नियोजन अध्ययन अनुभव व अध्यापन साहित्य यांना प्राधान्यक्रम दयावा. |

| योग्य | कशा प्रकारे | अयोग्य | कारणे |
|---|---|---|---|
| | | | कारण प्रशिक्षणार्थी पाठाबाबत प्रथम विचार करतो. पाठ्यक्रमाचा क्रम उपयोगिता मूल्यावर आधारित असावा. जून १९९४ च्या पुनरचित अभ्यासक्रमास न्याय देणारा पाठ्यक्रम असावा. |

वरील सारणीवरुन अशी माहिती मिळते की, संबंधित पाठ्यक्रमातील क्रमबध्दता योग्य आहे. असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्याची संख्या ११ म्हणजे ७३.३३ टक्के आहेत आणि या पाठ्यक्रमातील क्रमबध्दता "अयोग्य" आहे असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्याची संख्या ०४ म्हणजे २८.५७ टक्के आहे. यावरुन पाठ्यक्रमाची क्रमाची क्रमबध्दता योग्य आहे असे म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या "अयोग्य" आहे. म्हणणाऱ्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा अधिक आहे.

पाठ्यक्रमातील क्रमबध्दता कशा प्रकारे योग्य आहे हे सांगणारी त्यांनी ३ विधाने नमुद केली आहेत. ती योग्य वाटतात. तसेच काही [०४] प्राध्यापकांनी संबंधित पाठ्यक्रमाची क्रमबध्दता "अयोग्य" आहे असे नमूद करुन त्याची ०४ कारणे सारणीत लिहिलेली आहेत. ती कारणे ही योग्य वाटतात.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावली मध्ये प्रात्यक्षिक कार्यातील "ब" विभाग सूक्ष्म अध्यापन कौशल्ये यावर होता. या प्रश्नावलीत ३ नंबरचा प्रश्न "प्रशिक्षणार्थ्यांना महत्त्वाचा सामान्य अध्यापन कौशल्य क्षमता साध्य करण्याच्या दृष्टिने सूक्ष्म कौशल्य समाधानकारक वाटतात का ?" असा होता हा प्रश्न मुक्त व संमिश्र स्वरुपाचा होता. या प्रश्नाला "होय / नाही असे दोन पर्याय दिले होते. तसेच या सूक्ष्म अध्यापन कौशल्याशी संबंधित आणखी दोन उपप्रश्न विचारले होते. त्यातील पहिला प्रश्न "उत्तर होय असल्यास कशा प्रकारे " आणि "नसल्यास का नाही" असा दूसरा प्रश्न होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सा.क्र.४.३०] नमूद केला आहे.

सारणी क्र. ४.३२

| प्राध्यापकांची संख्या | | "होय" असल्यास कशा प्रकारे | "नाही" असल्यास का नाही. |
|---|---|---|---|
| होय | नाही | | |
| ०९ | ०६ | अर्थपूर्ण हालचाली, उत्साहवर्धकता, आत्मविश्वास निर्माण होतो. सभाधीटपणा, अध्यापन प्रभावी करता येते. प्रशिक्षणार्थी अधिक सजग होतो. प्रशिक्षणार्थ्यांत वाचन विकास होतो. फलक लेखन, प्रकटवाचन इ. सूक्ष्म कौशल्ये विकसीत करता येतात अध्यापनाचा दर्जा उंचावण्यास उपयोग | प्रारंभी महत्वाची मूलभूत कौशल्ये आत्मविश्वास देतात. त्यातून आपणाजवळ शिक्षकांची कौशल्ये आहेत हे सुखद अनुभूती मिळते. पण सर्वच्या सर्व कौशल्य आत्मसात आणता येत नाहीत. सर्व कौशल्याचे बारकावे ओढून ताणून आणले आहेत. त्यातील एकात्मता बाजूला रहाते. प्रातिनिधीक कौशल्ये रुजविता येतात. |

वरील सारणी वरुन अशी माहिती मिळते की, प्रशिक्षणार्थ्यांना सर्वसाधारण सामान्य अध्यापन कौशल्य क्षमता प्राप्त करण्याच्या दृष्टीने सूक्ष्म अध्यापन कौशल्ये समाधानकारक आहेत असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांची संख्या ०९ म्हणजे ६०.०० टक्के आहे. तर सूक्ष्म अध्यापन कौशल्ये समाधानकारक नाहीत असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांची संख्या ०६ म्हणजे ४०.०० टक्के आहे. यावरुन "होय" म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांची प्रमाण "नाही" म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या संख्येपेक्षा अधिक आहे, हे निश्चित करता येते. तसेच योग्यता व अयोग्यता किंवा होय व नाही म्हणण्याची कारणे नमूद केलेली आहेत, ती योग्य वाटतात.

प्रश्नावली मध्ये प्रात्यक्षिक कार्यातील चौथा प्रश्न "आणखी कोणती सूक्ष्म अध्यापन कौशल्ये" या पाठ्यक्रमात समाविष्ट करावीत असा होता. हा प्रश्न ना विचारलेला होता. त्याचे स्वरुप मुक्त होते. तसेच या प्रश्नातील अध्यापन कौशल्याचा का समावेश करावा असा पुढचा उपप्रश्न होता. त्यामुळे नवीन कौशल्ये का अंतर्भूत करावीत याची कारणमीमांसा मिळणार होती या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी क्रमांक ४.३३ ] मध्ये नमूद केला आहे.

सारणी क्र. ४.३३

नवीन सूक्ष्म अध्यापन कौशल्ये

| अ.नं. | अध्यापन कौशल्ये | कारणमीमांसा |
|---|---|---|
| १] | शास्त्रीय व शैक्षणिक उपकरणाचा सुयोग्य वापर | या साहित्याचा वापर प्राध्यापक/शिक्षक विवेचनाच्या भरात करत नाहीत. शिक्षकांची कृतीशिलता यामुळे महत्वाची ठरते. |
| २] | प्रकटवाचन, मूकवाचन कौशल्य | मराठी अध्यापन प्रभावी करणेसाठी ही उपयुक्त कौशल्ये आहेत. |
| ३] | फलकलेखन, प्रश्न कौशल्य | अध्यापन प्रभावी करणेसाठी परिणामकारक ठरतात. |
| ४] | स्पष्टीकरण कौशल्ये | मूलभूत भाषिक कौशल्य प्राप्त करण्यास उपयुक्त आहे. |

वरील सारणीवरुन असे म्हणता येते की, मराठी अध्यापन पध्दती मध्ये वरील नवीन कौशल्याचा अंतर्भाव करावा त्यासाठीमागची कारणे योग्य, प्रकारे नमूद केली आहेत.

अधिव्याख्यात्यांच्या ज्या प्रश्नावली मध्ये प्रात्यक्षिक कार्यातील "ड" भाग आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या कृतिसत्राबद्दल होता. आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या कृतिसत्रावर एकूण ७ प्रश्न मुक्त व संमिश्र स्वरुपाचे होते. हेतू हा होता की, आशययुक्त कृतिसत्र समाधानकारक आहे की नाही.हे पहाणे / जाणून घेणे. यातील पहिला प्रश्न आशययुक्त अध्यापन पध्दती संदर्भात राबविल्या जाणाऱ्या कृतिसत्रा बद्दल आपण समाधानी आहात का ? असा विचारला होता. या प्रश्नाला "होय आणि नाही" असे दोन पर्याय दिले होते. सहमत पर्याया पुढे बरोबर [✓ ] अशी खूण करावयास सांगितली होती. या प्रश्नालाच संबंधित असा दुसरा प्रश्न "नसल्यास का नाही ?" त्याचे कारण विचारले होते. तिसरा प्रश्न आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या कृतिसत्रामुळे मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील आशय व पाठ्यपुस्तकातील आशय यातील संबंधाविषयी जागृती करता येते का ? असा मुक्त व संमिश्र प्रश्न विचारला होता. चौथ्या प्रश्नात "पाठ्यक्रमातील आशय व पाठ्यपुस्तकातील आशय यांच्यामधील संबंधाविषयी जागृती कशाप्रकारे करता येते ? असा प्रश्न विचारला होता हा प्रश्न संमिश्र स्वरुपाचा

होता" पाचव्या प्रश्नात पर्यायाचे मत विचारले होते.

"आशय आणि अध्यापन पध्दती यांचे सहेतूक एकात्मिकरण करण्याच्या तत्वाचे आचरण करण्यास व त्यानुसार निरिक्षण क्षम अध्यापन कौशल्ये विकसित करण्यास मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचे कृतिसत्र लाभदायी ठरते का ?" असा पाचवा प्रश्न "होय आणि नाही" या द्विपर्यायी स्वरूपात विचारला होता याच प्रश्नांशी संबंधित आणखी दोन उपप्रश्न होते. "असल्यास कसा" आणि "नसल्यास का नाही" त्याची कारणे नमुद करावयास सांगितली होती. वरील ७ प्रश्नांना मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्रमांक ४.३२] नमुद केला आहे.

सारणी क्रमांक ४.३४

आशययुक्त अध्यापन पध्दती कृतिसत्र

| अ.नं. | प्रात्यक्षिक कार्याचा तपशिल | अधिव्याख्यात्यांची संख्या होय | नाही | कारणमिमांसा |
|---|---|---|---|---|
| १. | आशययुक्त अध्यापनाच्या कृतिसत्राबद्दल समाधानी आहात का ? | १० | ०० | * आशयानुसार अध्यापन पध्दतींचा वापर करून अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी करता येईल.<br>* विषयज्ञान होते. |
| | | | ०५ | * कृतिसत्र कार्यान्वित आणण्याच्या दृष्टिने यशस्वी झालेले नाही.<br>* ही संकल्पना स्पष्ट झालेली नाही.<br>* अत्यावधित सर्व संकल्पना समजावून देणे-घेणे कठीण होते.<br>* कृतिसत्रात समाविष्ट केलेले घटक व कृतिसत्रात समाविष्ट केलेले घटक व कृतिसत्राचे नियोजन यांच्यात संदिग्धता निर्माण झाली आहे. |

| अ.नं. | प्रात्यक्षिक कार्याचा तपशिल | अधिव्याख्यात्यांची संख्या होय | नाही | कारणमिमांसा |
|---|---|---|---|---|
| | | | | * आशयावर प्रभुत्व मिळविण्यास हे कृतिसत्र अजिबात उपयोगी पडत नाही.<br>* सविस्तर, सूक्ष्म मार्गदर्शन नीट मिळत नाही. शंकानिरसन होत नाही. आशयासहित अध्यापनाची टाचणे नाहीत. काही अध्यापन पध्दतींना पर्याय पाय-या नाहीत पाठटाचणे काढताना गोंधळ निर्माण होतो. |
| २. | * आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या कृतिसत्रामुळे मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील आशय यातील संबंधाविषयी जागृती करता येते का ? | १५ | | * मराठी विषयाच्या तज्ञांचे मार्गदर्शन व प्रात्यक्षिकाचा टाचणासह समावेश करावा.<br>* आशययुक्त अध्यापन पध्दतीची उद्दिष्टेच ती आहेत.<br>* आशयाचा सखोल पाठपुरावा केला जातो.<br>* विश्लेषणामुळे घटकांच्या अंतरंगात शिरणे सोपे जाते.<br>* आशयानुरूप अध्यापन पध्दती, अनुभव, मूल्य साधने यांचा सुयोग्य समन्वय साधला जातो.<br>* आशययुक्त अध्यापनाच्या स्वजाणीवेला चालना देता येते.<br>* काही आशयाचे उपमुद्दे पाडता येत नाहीत. उदा.कविता.<br>* आशयाचे महत्व पटते आशयानुसार अध्यापन पध्दतीचा मुळधरु लागतो, अध्यापनास योग्य ती दिशा मिळते.<br>* आशयाची विविध अंगे, पैलू इ.वर प्रकाश टाकता येतो. |

| अ.नं. | प्रात्यक्षिक कार्यांचा तपशिल | अधिव्याख्यात्यांची संख्या होय | नाही | कारणमिमांसा |
|---|---|---|---|---|
| | | | | * मराठी अध्यापन पध्दतीच्या वर्गीकरणानुसार पाठ्यपुस्तकातील आशयाचे विश्लेषण करुन एकमेकांचा परस्पर संबंध साधता येतो. |
| ३. | आशय आणि अध्यापन पध्दती यांचे सहेतुक एकात्मिकरण करण्याच्या तत्वाचे आचरण करण्यास व त्यानुसार निरीक्षण क्षम अध्यापन कौशल्ये विकसित करण्यास मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचे कृतिसत्र लाभदायी ठरते का ? | १० | | आशय व स्तरानुसार अध्यापन पध्दतीचा वापर केला जातो. चर्चेतुन, कृतीतुन एक नवा अनुभव मिळतो चुकत चुकत शिकण्याची एक संधी मिळते.<br>* मुळ संकल्पना साकार होते.<br>* प्रशिक्षणार्थी संबोध शोधून काढू शकतात शिक्षकास संबोध निर्मितीचा अर्थ समजतो. कृतीसत्राने एक दृष्टी येते.<br>* वाङ्‌मय प्रकारानुसार त्यांची वैशिष्टे लक्षात घेवून अध्यापन पध्दतींचा वापर करता येईल.<br>* पाठटाचणात सूक्ष्मता येते. सरदोबळे वृत्ती जाते. आशय व पध्दतीचा विचार होतो.<br>*मराठी भाषेची व मराठी अध्यापनाची उद्दिष्टे यांचाच संबंध येथे येतो.<br>* आशयाविश्लेषण, संरचना यामुळे घटकाचे स्थान व त्यातील संबोध, संज्ञा नेमक्या समजतात. घटकाचा विचार विविध अंगानी करता येतो त्यामुळे अध्यापन दर्जेदार होऊ शकते.<br>* आशयानुसार अध्यापन पध्दतींचा वापर करुन अध्ययन-अध्यापन प्रक्रिया प्रभावी बनविता येते. |
| | | | ०५ | * मराठीचे आशययुक्त अध्यापन हे अध्यापकाच्या अंगभूत कौशल्यावर आधारित आहे. कृतिसत्रातील |

| अ.नं. | प्रात्यक्षिक कार्याचा तपशिल | अधिव्याख्यात्याची संख्या | | कारणमिमांसा |
|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | |
| | | | | वातावरण हे कृत्रिम असते आशयाशी समरस होण्यास वर्गवातावरणाचीच गरज असते. |

वरील सारणीवरुन अशी माहिती मिळते की, आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या कृतिसत्राबद्दल समाधानी आहोत असे म्हणणा-या अधिव्याख्यात्यांची संख्या १० म्हणजे ६६.६६ टक्के आहे आणि आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या कृतिसत्राबद्दल समाधानी नाही असे म्हणणा-या अधिव्याख्यात्यांची संख्या ०५ म्हणजे ३३.३३ टक्के आहे. यावरुन "होय" म्हणणा-या अधिव्याख्यात्यांची संख्या "नाही" म्हणणा-या संख्येच्या तुलनेने अधिक आहे. याचा अर्थ असा की, आ.अ. पध्दतीचे कृतिसत्र काही अंशी समाधानकारक आहे.

आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या कृतिसत्रामुळे मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील आशय व पाठ्यपुस्तकातील आशय यातील संबंधाविषयी जागृति करता येते का ? या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद वरील सारणीत नमुद केला आहे. त्यावरुन असा अर्थ काढता येतो की, संबंधीत कृतिसत्रात जागृति करता येईल असे म्हणणा-या अधिव्याख्यात्यांची संख्या १५ म्हणजे १०० टक्के आहे आणि"संबंधित जागृति करता येणार नाही" असे म्हणणा-या अधिव्याख्यातांची संख्या ० म्हणजे ०० टक्के आहे.

आशय आणि अध्यापन।पध्दती यांचे सहेतुक एकात्मिकरण करण्याच्या तत्वाचे आचरण करण्यास व त्यानुसार निरीक्षणक्षम कौशल्ये विकसीत करण्यास मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचे कृतिसत्र लाभदायी ठरते; असे म्हणणा-या अधिव्याख्यात्यांची संख्या १० म्हणजे ६६.६६ टक्के आहे तर नाही म्हणणा-या अधिव्याख्यात्यांची संख्या ०५ म्हणजे ३३.३३ टक्के आहे. या प्रश्नात "असल्यास कशाप्रकारे" त्याची काही विधाने नमुद केली आहेत ती सारणीत दिली आहेत आणि "नसल्यास का नाही" त्याची ही कारणे सारणीत नमुद केली आहेत. या नमुद केलेल्या विधानांचा/कारणांचा विचार प्रकरण ५ मध्ये "निष्कर्ष व शिफारशी" काढताना केलेला आहे.

शिक्षकांच्या प्रश्नावलीमध्ये प्रात्यक्षिक कार्यातील २० नंबरच्या प्रश्नामध्ये "आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या कृतिसत्रामुळे आता आपण करत असलेल्या मराठीच्या

मराठीच्या अध्यापनाला उपयोग झाला काय ? असा प्रश्न विचारला होता. हा प्रश्न मुक्त व संमिश्र स्वरूपाचा होता, या प्रश्नाशी संबंधित झाला असल्यास कशा प्रकारे असा एक उपप्रश्न होता. या दोन्ही प्रश्नांना मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी क्रमांक ४.३५ ] मध्ये नमुद केला आहे.

सारणी क्रमांक ४.३५

आशय युक्त अध्यापन पद्धतीच्या कृतिसत्राचा उपयोग

| अ.नं. | प्रात्यक्षिक कार्ये | होय | नाही | असल्यास कशा प्रकारे |
|---|---|---|---|---|
| १ | आशययुक्त अध्यापन पद्धतीच्या कृतिसत्राचा मराठी अध्यापनाला उपयोग होतो काय ? | ११० | | पाठ्यपुस्तकाचा परिपूर्ण आशय उद्देश लक्षात आले.<br>उद्दिष्टानुसार घटकांचे वर्गीकरण करता आले.<br>वेगवेगळ्या अध्यापन पद्धतीने पाठ घेता आले.<br>विविध स्तरानुसार अध्यापन पद्धतीची निवड करता आली.<br>कृतिसत्रामुळे अध्यापनाशी संबंधित शैक्षणिक साधने तयार करता येतात.<br>उद्दिष्टानुसार मराठीचा पाठ्यक्रम आहे. किंवा नाही ते पहाता येते.<br>अभ्यासक्रमातील उद्दिष्टानुसार पाठ्यक्रम आहे की नाही ते पहाता येते. |
| | | | ०३० | कृतीवर भर देता येतो. स्वयंअध्यापन होते.<br>पाठ्यक्रम,अभ्यासक्रमाची पूर्ण जाणीव झाली.<br>वेगवेगळ्या अध्यापन पद्धतीने टाचणे काढता येत नाही. |

| प्रात्यक्षिक कार्य | होय | नाही | असल्यास कशा प्रकारे |
|---|---|---|---|
| | | | संबोधाची पूर्ण माहिती आकलन होत नाही. मराठीतील पद्याचे उपमुद्दे पाडता येत नाहीत. |

वरील सारणी वरून असा माहिती मिळते की, मराठी अध्यापन पद्धतीचे आता अध्यापन करत असताना आशययुक्त अध्यापन पद्धतीच्या कृतिसत्राचा उपयोग होतो असे म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या ११० म्हणजे ७८.५७ टक्के आहे. तर मराठी अध्यापनाला कृतिसत्राचा पद्धतीच्या कृतिसत्राचा आता करत असलेल्या अध्यापना मध्ये उपयोग होत नाही. असे म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या ३० म्हणजे २१.४२ टक्के आहे. याचा अर्थ असा की, आशय युक्त अध्यापन पद्धतीच्या कृतिसत्राचा आता करता असलेल्या अध्यापना मध्ये उपयोग होत नाही असे म्हणणाऱ्याचा शिक्षकांची संख्या

शिक्षकांच्या प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक २१ मध्ये पाक्षिक शाळा घालविल्यानंतर तेथे मिळणारा अनुभव शिक्षकांना पुरेसा वाटतो का ? असा स्वरूपाचा मुक्त प्रश्न विचारला होता या प्रश्नाचा हेतू पाक्षिक शाळांचा फायदा जाणून घेणे हा होतो. या प्रश्नाला "होय/ नाही" असे दोन पर्याय दिले होते. सहमत असलेल्या पर्याया समोर बरोबर [ ✓ ] असे चिन्ह करावयास सांगितले होते. या प्रश्नाशी संबंधित आणखी तीन उपप्रश्न विचारले होते. अनुभव पुरेसा वाटत असल्यास कशा प्रकारे ?" त्याची नोंद करावयास सांगितली होती. तुम्ही त्या शाळा मध्ये राबविलेल्या उपक्रमाचा तुम्हाला आता उपयोग होतो काय ? या प्रश्नासाठी होय आणि नाही असे द्विपर्याय दिले होते. सहमत पर्याया समोर "बरोबर" [ ✓ ] चिन्ह करावयास सांगितले आणि ते कशा प्रकारे ते नोंद करण्यास सांगितले. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी क्र.४.३६ ] नमुद केला आहे.

सारणी क्रमांक ४.३६ [अ]

पाक्षिक शाळेचा अनुभव

सारणी क्रमांक ४:३६(अ)

पाक्षिक शाळेचा अनुभव

| अ.नं. | प्रात्यक्षिक कार्याचा तपशिल | शिक्षकांची संख्या होय | नाही | उपयोग कशा प्रकारे |
|---|---|---|---|---|
| १) | पाक्षिक शाळेचा अनुभव शिक्षक बनल्यानंतर पुरेसा वाटतो काय ? | १२० | | पाक्षिक शाळेत हजेरी घेणे, प्रत्यक्ष पाठ घेणे, खेळ घेणे, सांस्कृतिक कार्यक्रम घेणे, चाचणी परीक्षा घेणे इ. शिक्षकी व्यवसायाचे अनुभव मिळाले.<br>शालेय दप्तराची माहिती मिळली.<br>विद्यार्थी-शिक्षक यांच्यातील भाषिक देवाण-घेवाण करता आली.<br>एकत्रितरित्या एकमेकांच्या सहकार्याने काम करण्याचा अनुभव मिळाला.<br>वर्ग शिक्षकाची जबाबदारी कळते.<br>अध्यापनातील शिस्त सांभाळता येते. |
| | | | २० | मराठी विषयाचे साहित्य एवढे विशाल आहे की त्यामध्ये अनुभव अधिक हवा आहे.<br>सलग सरावपाठासाठी काही घटक लहान वाटतात. |

वरील सारणीवरून अशी माहिती मिळते की, परिक्षा शाळा चालविल्यानंतर तेथे मिळणारा अनुभव पुरेसा वाटतो असे म्हणणा-या शिक्षकांचे प्रमाण १२० म्हणजे ८५.७१ टक्के आहे आणि पाक्षिक शाळेचा अनुभव आता शिक्षक बनल्यानंतर पुरेसा वाटत नाही असे म्हणणा-या शिक्षकांचे प्रमाण २० म्हणजे १४.२८ टक्के आहे. १२० शिक्षकांनी हा अनुभव कशाप्रकारे पुरेसा वाटतो त्याची माहिती दिली आहे आणि "नाही" म्हणणा-या शिक्षकांनी सुध्दा हा अनुभव पुरेसा का वाटत नाही त्याची कारणे दिली

आहेत. याचा अर्थ असा की, पाक्षिक शाळेतील अनुभव उपयुक्त आहे.

सारणी क्रमांक ४:३७ [ब]

पाक्षिक शाळेतील उपक्रम

| अ.नं. | प्रात्यक्षिक कार्याचा तपशिल | शिक्षकसंख्या | | कशाप्रकारे |
|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | |
| १. | तुम्ही त्या शाळेमध्ये राबविलेल्या उपक्रमाचा तुम्हाला आता उपयोग होतो काय ? | १३० | ० | * चाचणी कशी द्यावी, प्रश्नपत्रिका, गुणदानतक्ता तयार करता येतो.<br>विविध सांघिक, वैयक्तिक खेळ कशाप्रकारे द्यावे ते कळते.<br>निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, घेता येतात.<br>सहली, चित्रकला, रांगोळी,<br>गायन, कथाकथन, विनोदी किस्से इ. मुळे सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये विविधता आणता येते. |
| | | | १० | नियोजन करण्यात अनेक अडचणी येतात.<br>अनुभवामुळे जबाबदारीचे ओझे हलके वाटते.<br>शाळेत एवढे उपक्रम राबविण्यासाठी पुरेसा कालावधी मिळत नाही. |

वरील सारणीवरून अशी माहिती मिळते की, पाक्षिक शाळेमध्ये राबविलेल्या उपक्रमाचा उपयोग होतो असे म्हणणा-या शिक्षकांची संख्या १३० म्हणजे ९२.८५ टक्के आहे आणि तो कशाप्रकारे होतो त्याची माहिती देणारी विधाने ही दिली आहेत. तसेच पाक्षिक शाळेमध्ये राबविलेल्या उपक्रमाचा उपयोग होत नाही. म्हणणा-या शिक्षकांची संख्या १० म्हणजे ०७.१४ टक्के आहे. त्याची कारणे नमुद केलेली आहेत, यावरून "होय" प्रतिसाद असणा-या शिक्षकांचे प्रमाण अधिक आहे,

हे सिध्द होते.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीमध्ये प्रात्यक्षिक कार्यामध्ये "ड" भागात सरावपाठ प्रशिक्षण कार्यक्रमाबद्दल २ प्रश्न आणि ४उपप्रश्न विचारले होते. आठ नंबरचा प्रश्न "माध्यमिक शाळेसाठी शिक्षक तयार करणेसाठी प्रशिक्षणार्थ्यांना ठेवलेली सरावपाठसंख्या पुरेशी आहे काय ?" असा मुक्त प्रश्न विचारला होता. हा द्विपर्यायी प्रश्न होता नसल्यास ती किती असावी ? का ? या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्र.४.३८] नमुद केला आहे.

सारणी क्रमांक ४.३८

सराव पाठ प्रशिक्षण कार्यक्रम

| अ.नं. | प्रात्यक्षिकाचा तपशिल | प्राध्यापक संख्या | | असल्यास कशाप्रकारे/ नसल्यास कारणे. |
|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | |
| १. | माध्यमिक शाळेसाठी शिक्षक तयार करणेसाठी प्रशिक्षणार्थ्यांना ठेवलेली पाठ संख्या पुरेशी आहे काय ? | ०९ | | सध्याची सरावपाठ संख्या पुरेशी आहे.त्यामुळे प्रशिक्षणार्थ्याला अध्यापनाचा अनुभव पुरेसा येतो. पुढील शिक्षकीपेशात तो स्त:मध्ये अधिक कार्यक्षमता आणू शकतो. पाठतंत्राचे ज्ञान अवगत होते. २० पाठातून अपेक्षित कौशल्ये पूर्ण करता येतात कारण आवश्यक तेवढे विद्यार्थी वर्गात असतात. |
| | | | ०६ | गद्य, पद्य, व्याकरण, रचना यावर किमान एक पाठ प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याने प्रशिक्षण काळात घ्यावा, असे वाटते कारण पाठ नियोजनाच्या वेळापत्रकात मराठीच्या सर्व उपांगाचे घटक येत नाहीत.: १६ पाठ हवेत . रचनेबाबत तुलनेने पाठ कमी होतात. प्रशिक्षणात अध्यापक घडवायचा असतो. किमान १० चांगले व ६ नोंदविलेले हवेत. |

वरील सारणीवरुन अशी माहिती मिळते की, सध्या प्रशिक्षण काळात ठेवलेली पाठसंख्या पुरेशी आहे म्हणणा-या अधिव्याख्यात्यांची संख्या ०९ म्हणजे ६०.०० टक्के आहे तर ही पाठसंख्या पुरेशी नाही म्हणणा-या अधिव्याख्यात्यांची संख्या ०६ म्हणजे ४०.०० टक्के आहे. तसेच त्यांनी ही पाठसंख्या पुरेशी कशी आहे ते स्पष्ट केले आहे. तर "नाही" म्हणणा-यांनी त्याची कारणमिमांसा दिली आहे. दोन्हींचा विचार एकत्रितपणे निष्कर्ष काढताना केलेला आहे.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीत प्रात्यक्षिक कार्यामध्ये ९ नंबरचा प्रश्न "प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन देण्यासाठी आपणांस पुरेसा वेळ मिळतो का ?" असा संमिश्र स्वरुपाचा प्रश्न विचारला होता याला "होय/नाही" असे पर्याय होते. याच प्रश्नाला अनुसरुन "या मार्गदर्शना बाबत तुम्ही समाधानी आहात का ?" असा प्रश्न मुक्त स्वरुपाचा विचाला होता. या दोन्ही प्रश्नाला जवळचा नकारार्थी प्रश्न होता. "नसल्यास" का नाही त्याची कारणे सांगा. वरील प्रश्नांना मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्रं.४.३९] नमुद केले आहे.

सारणी क्रमांक ४.३९

सराव पाठांचे मार्गदर्शन

| अ.नं. | प्रात्यक्षिकाचा तपशिल | अधिव्याख्यात्यांची संख्या | | कसाप्रकारे / नसल्यास का नाही |
|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | |
| १. | प्रशिक्षणार्थ्यांना सराव पाठांना मार्गदर्शन देण्यासाठी आपणांस पुरेसा वेळ मिळतो का ? | ०८ | | प्रत्येक पाठ हा वार्षिक पाठ समजून मार्गदर्शन केले जाते. अध्यापन पध्दतीच्या तासाखेरीज अन्य वेळ द्यावा लागतो. |
| | | | ०७ | मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठाची व्याप्ती मोठी आहे. मराठी भाषेचे क्षेत्र व्यापक आहे त्यामुळे वेळ कमी पडतो. दुय्यम मराठी घेणा-यांना अधिक वेळ मार्गदर्शनास उपलब्ध होत नाही. प्रत्याभरण होत नाही. |

वरील सारणीवरुन अशी माहिती मिळते की, मार्गदर्शनासाठी पुरेसा वेळ मिळतो असे म्हणणा-या अधिव्याख्यात्यांची संख्या ०८ म्हणजे ५३·३३ टक्के आहे त्याचे स्पष्टीकरण त्यांनी कशाप्रकारे या सदराखाली अधिक वेळ आणि वार्षिक पाठ समजून मार्गदर्शन करतो असे दिले आहे· तसेच मार्गदर्शनास पुरेसा वेळ मिळत नाही, मार्गदर्शना बाबत समाधानी नाही असे म्हणणा-या अधिव्याख्यात्यांची संख्या ०७ म्हणजे ४६·६६ टक्के आहे· त्याची कारणे त्यांनी मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठांची व्याप्ती मोठी, क्षेत्र व्यापक, वेळ अपुरा, दुय्यम मराठी अध्यापन पद्धती होणारे प्रशिक्षणार्थी असतात, अशी नमुद केली आहेत·

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीमध्ये "इ" प्रात्यक्षिक कार्यातील "इ" भागात सलग सरावपाठ प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत सात प्रश्न १०, ११, १२, प्रश्न क्रमांक मध्ये विचारले होते· १० नंबरचा प्रश्न "सलग सरावपाठा बाबत तुम्ही समाधानी आहात काय ? असा विचारला होता· हा प्रश्न द्विपर्यायी स्वरुपाचा होता· यामध्ये "होय/नाही" असे पर्याय दिले होते· पुढच्या उपप्रश्नात "असल्यास कशाप्रकारे" आणि त्यापुढील उपप्रश्नात "नसल्यास का नाही" असे प्रश्न विचारले होते· या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्र·४·४०] नमुद दिला आहे·

सारणी क्रमांक ४·४०

सलग सरावपाठ प्रशिक्षण कार्यक्रम

| अ·नं· | प्रात्यक्षिक तपशिल | अधिव्याख्यात्यांची संख्या | | असल्यास कशाप्रकारे/नसल्यास का नाही |
|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | |
| १· | सलग सराव पाठ बाबत तुम्ही समाधानी आहात काय ? | १० | | घटक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत होते·<br>आशयसातत्य व चाचणीद्वारा विद्यार्थी आत्मविश्वासाने शाळेत वावरु शकतो·<br>एका घटकाचे नियोजन कसे करावे ते कळते·<br>अधिक समृध्द अध्यापनास वाव मिळतो·<br>सलग सरावातून एक संपणा आणता येतो· |

| अ.नं. | प्रात्यक्षिक तपशिल | अधिव्याख्यात्यांची संख्या | | असल्यास कशाप्रकारे/ नसल्यास का नाही |
|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | |
| | | | | विविध अध्यापन पध्दती वापरता येतात. त्यानुसार मुल्यमापन करता येते. |
| | | | | सलग सराव्पाठांमुळे घटकातील आशय संबोध,संकल्पना सर्वदृष्टीने अध्यापन करता येते. अध्यापन पध्दतशीर होते. |
| | | | | आशयाची शृंखला राखता येते. |
| | | | | विषयांश विवेचन मुद्देसुद करता येते. |
| | | | ०५ | सलग सरावपाठामुळे त्या त्या घटकांची पुरेशी तयारी त्यात्या वेळेत होत नाही. |
| | | | | घाई गडबडीने काम उरकणे एवढेच हेतू नजरेसमोर ठेवून काम होते. |
| | | | | एकाच वाङ्:मय प्रकाराचे पाठ घेणे शक्य |
| | | | | मागील सलग सरावपाठातील त्रुटी सुधारण्यास वेळ मिळत नाही. |
| | | | | सराव पाठ पूर्ण करणे एवढाच भाग महत्वाचा समजला जातो. |

वरील सारणीवरुन असे माहित होते की, सलग सरावपाठाबाबत समाधानी असणा-या अधिव्याख्यात्यांची संख्या १० म्हणजे ६६.६६ टक्के आहे तर असमाधानी अधिव्याख्यात्यांची संख्या ०५ म्हणजे ३३.३३ टक्के आहे. समाधानी असणा-या अधिव्याख्यात्यांनी आपली मते कशाप्रकारे या सदराखाली स्पष्ट केली आहेत तर " का समाधानीनाही त्याची कारणे असमाधानी असणा-या अधिव्याख्यात्यांनी नमुद केली आहेत. याचा विचार निष्कर्ष काढताना केलेला आहे.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीमध्ये प्रात्यक्षिक कार्यातील ११ नंबरचा

प्रश्न "सलग सराव पाठा संबंधीचे नियोजन योग्य आहे का ?" असा संमिश्र स्वरूपाचा विचारला होता. याला द्विपर्याय दिले होते त्यामध्ये "योग्य/अयोग्य" पर्यायापैकी सहमत असलेला पर्याय ठेवून नको असलेला पर्याय खोडाव्यास सांगितला होता. तसेच सलग सराव पाठासंबंधीचे नियोजन अयोग्य असल्यास "ते तुमच्या मते, कसे नियोजन असावे" ते नमुद कराव्यास सांगितले होते. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्रमांक ४.४१] नमुद केला आहे.

सारणी क्रमांक ४.४१

सलग सराव पाठासंबंधीचे नियोजन

| अ.नं. | प्रात्यक्षिकांचा तपशिल | विद्यार्थ्यांची संख्या | | नियोजना संबंधीची मते |
|---|---|---|---|---|
| | | योग्य | अयोग्य | |
| १] | सलग सराव पाठासंबंधीचे नियोजन योग्य आहे का ? | ०५ | १० | * नीट राबवता येत नाही.<br>* स्वाध्याय तपासण्यासाठी वेळ राखून ठेवावा.<br>* सलग सराव पाठ नसावेत. शालेय कामकाज व शालेय पद्धती जाणून घेण्यावर भर देण्यात यावा.<br>* सलग सराव पाठाचे नियोजन ०१ महिन्याचे असावे,<br>* सलग सराव पाठात प्रास्तविकाचे टाचण किती व कसे दिर्घ करायचे ते जमत नाही. नियोजनात असलेल्या गोष्टी प्रत्यक्षात आणताना फार घाई गडबड होते. |

वरील सारणीवरुन अशी माहिती मिळते की, सलग सराव पाठासंबंधीचे नियोजन "योग्य" आहे असे म्हणणा-या [illegible] ची संख्या ०५ म्हणजे ३३.३३ टक्के आहे.

अधिव्याख्यात्यांची
तर "अयोग्य" आहे असे म्हणणा-या / संख्या १० म्हणजे ६६·६६ टक्के आहे· याचा अर्थ असा की, सलग सरावपाठा संबंधीचे नियोजन अयोग्य आहे ·

अधिव्याख्यात्यांची प्रश्नावली मध्ये प्रात्यक्षिक कार्यातील १२ नंबरचा प्रश्न सलग सराव पाठात आणखी कोणत्या गोष्टीचा समावेश करावा असा होता या प्रश्नात इतर बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे का, हे समजावून द्यावयाचे होते· हा प्रश्न मुक्त स्वरूपाचा होता· तसेच इतर बाबीचा समावेश करावा लागल्यास त्याची कारणे पुढच्या उपप्रश्नात विचारली होती· या दोन्ही प्रश्नांना मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी क्र· ४·४२ ] नमुद केला आहे·

सारणी क्र·४:४२

सलग सराव पाठात - अन्य बाबींचा अंतर्भाव

| अ·नं· | प्रात्यक्षिक कार्य सलग सराव पाठात अंतर्भूत कराव्या लागणा-या इतर बाबी · | कारणमीमांसा |
|---|---|---|
| १] | अभ्यासपूरक कार्यक्रमाचा अनुभव दयावा· | शालेय कामकाजाचे स्वरूप, अभ्यासाव्यतिरिक्त इतर अनुभव, प्रशिक्षणार्थींना येतात· |
| २] | सलग सराव पाठामध्ये दोन दिवसाचे अंतर असावे· | विद्यार्थ्यांचा स्वाध्याय, तपासण्यासाठी वेळ राखून ठेवावा· |
| ३] | भाषिक कार्यक्रम, प्रशस्तिपत्रके, हस्तलिखित काढावे· | भाषिक कौशल्य सुधारता येते, विद्यार्थ्यांना उत्साहवर्धक बनवता येते· |

या सारणीवरून असे माहित होते की, अभ्यासपूरक कार्यक्रम, भाषिक कार्यक्रम, प्रशस्तिपत्रके, हस्तलिखित इ· बाबी सलग सराव पाठ प्रशिक्षण कार्यक्रमात अंतर्भूत कराव्यात कारणमीमांसा नमुद केल्यावरून त्याचे विद्यार्थ्यांना फायदे आहेत हे स्पष्ट होते·

अधिव्याख्यात्याच्या प्रश्नावली मध्ये प्रात्यक्षिक कार्यांतर्गत - पाक्षिक शाळा या उपविभागावर तीन प्रश्न विचारले होते· त्यातील प्रश्न क्रमांक १३ मध्ये पाक्षिक शाळेचा उपक्रम मराठीचा कुशल अध्यापक होण्याच्या दृष्टिने समाधानकारक वाटतो का ? अशा स्वरूपाचा संमिश्र प्रश्न विचारला होता· या प्रश्नाला होय / नाही असे पर्याय दिले होते· दोन्ही पैकी पर्यायी मता समोर " असल्यास कारण" ? आणि नसल्यास

का नाही" याची कारणे नमुद करावयास सांगितली होती. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्रमांक ४.४० ] नमुद केला आहे.

सारणी क्रमांक ४:४३

पाक्षिक शाळेचा उपक्रम

| अ.नं. | प्रात्यक्षिक कार्य | अधिव्याख्यात्याची होय | नाही. | असल्यास कशा प्रकारे | नसल्यास का नाही |
|---|---|---|---|---|---|
| १] | पाक्षिक शाळेचा उपक्रम मराठीचा कुशल अध्यापन बनण्याच्या दृष्टिने समाधानकारक वाटतो का ? | ११ | ०४ | प्रशिक्षणाच्या काळात तात्त्विक भाग व अनुभव यांची सांगड घालता येते.<br>* प्रशिक्षणार्थ्यांच्या कर्तृत्वाला थोडी फार संधी मिळण्याचा हा कालावधी असतो.<br>* शाळेतील कामकाजांच्या पद्धतीची माहिती मिळते.<br>* सर्व उपक्रम राबवून घेता येतात.<br>अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रमाची सांगड घालता येते.<br>शालेय नियोजन, व्यवस्थापन, इ. बाबी महत्त्वपूर्ण वाटतात प्रशिक्षणार्थीसि प्रत्यक्ष शिक्षकी पेशाची ओळख होते व तो शिक्षक म्हणून काही कालावधी साठी पूर्ण वेळ काम करतो. त्यामुळे भावी जीवनाची रंगीत तालिम त्यास मिळते | पाक्षिक शाळेचा कार्यक्रम उपुयक्त आहे पण कमी वेळेत<br>घाईगडबडीने उरकण्याच्या वृत्तीमुळे अध्यापकास भीती, दडपण यामुळे कुशलता प्रगटण्यास अडथळे येतात.<br>अध्यापकाजवळ अनेक कला असाव्या लागतात. त्यापैकी मर्यादित कला कशा तरी गडबडीत सादर कराव्या लागतात.<br>अतिपरिचयात अवज्ञा असे होते.<br>वेळ अपुरा पडतो. |

शालेय वातावरणाचा
पूर्णांशाने अनुभव येतो.

वरील सारणी वरून अशी माहिती मिळते की, पाक्षिक शाळेचा कार्यक्रम समाधानकारक वाटलेल्या अधिव्याख्यात्यांची संख्या ११ म्हणजे ७३.३३ टक्के आहे. तर पाक्षिक शाळेचा कार्यक्रम समाधानकारक वाटला नाही असे म्हणणाऱ्या प्राध्यापकांची संख्या ०४ म्हणजे २६.६६ टक्के आहे याचा अर्थ असा पाक्षिक शाळे बद्दल असणारी मते ही वेगवेगळ्या प्रकारची आहेत. त्याचा विचार प्रकरण ५ मध्ये केलेला आहे.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीत प्रश्न क्र.१४ प्रात्यक्षिक पाठ परीक्षा वर विचारला होता. प्रात्यक्षिक पाठ परीक्षेसाठी वापरली जाणारी मूल्यमापनाची पद्धत तुम्हांस योग्य वाटते काय ? असा मुक्त व संमिश्र स्वरूपाचा हा प्रश्न होता. या प्रश्नाचा हेतू पाठ परीक्षेबद्दल माहिती जाणून घेणे हा होता. या प्रश्नाला हेतू पाठ परीक्षेबद्दल माहिती जाणून घेणे होता. या प्रश्नाला होय / नाही असे पर्याय दिले होते. योग्य पर्याया समोर बरोबर [ ✓ ] चिन्ह करावयास सांगितले होते. तसेच योग्य वाटत असल्यास का ? आणि अयोग्य वाटत असल्यास का ? असेही प्रश्न विचारून त्यांची मते विचारली होती. या प्रश्नांना मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सारणी क्र.४.४४ ] नमुद केला आहे.

सारणी क्रमांक ४.४४

प्रात्यक्षिक पाठ परीक्षा

| अ.नं. | होय | नाही | योग्य वाटल्यास का ? | अयोग्य वाटल्यास का ? |
|---|---|---|---|---|
| | अधिव्याख्यात्यांची संख्या : | | | |
| १ | १३ | ०२ | प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रात्यक्षिक कार्याचे योग्यमूल्यमापन करता येते.<br>सदरचे मूल्यमापन हे सर्वंकष मूल्यमापनाच्या दृष्टिने होते ते पाठपत्रकाच्या निरीक्षणाच्या मुद्यानुसार होते.<br>पाठाच्या पायऱ्याचा विचार केला जातो. अध्यापन तंत्रे, वलुप्त्या, पद्धती, शैक्षणिक | एकाच पद्धतीने पाठ घेतले जातात.<br>सुधारीत मूल्यमापन पद्धतीचा वापर व्हावा मूल्यमापनाची सद्याची पद्धती चाकोरी बद्ध आहे.<br>सतत निरीक्षण करूनही ठराविक मुद्यामुळे ती |

| अ·नं·: | होय नाही<br>अधिव्याख्यात्याची संख्या | योग्य वाटल्यास का ? | अयोग्य वाटल्यास का ? |
|---|---|---|---|
| | | साहित्य, विद्यार्थी सहभाग इ· बाबींचा विचार केला जातो·<br>प्रत्यक्ष पाठ पाहून निरीक्षण होते·<br>वर्षभरात केलेल्या कामकाजाचे मूल्यमापन केले जाते·<br>एका पाठावरून अध्यापनाची कौशल्ये अजमाविता येणार नाहीत·<br>दोन निरीक्षक, तटस्थपणे, सूक्ष्मपणे निरीक्षण करतात· त्यामुळे मूल्य मापन योग्य प्रकारे होते·<br>प्रस्तावनेपासून स्वाध्याया पर्यन्तच्या सर्व कौशल्याचा विचार करून मूल्यमापन केले जाते· | टाईपड आहे· मूल्यमापन [फ्री ] पाहिजे· |

वरील सारणीवरून अशी माहिती मिळते की, प्रात्यक्षिक पाठ परीक्षा समाधान कारक आहे· असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्याची संख्या १३ म्हणजे ८६·६६ टक्के आहे· तर पाठ परीक्षे बद्दल आपण समाधानी नाही, अयोग्य वाटते असे म्हणणारे अधिव्याख्यात्याची संख्या ०२ म्हणजे १३·१३ टक्के आहे· याचा अर्थ असा होतो की, प्रात्यक्षिक पाठ परीक्षे बद्दल समाधानकारक मत आहे·

शिक्षकांच्या प्रश्नावली मध्ये २२ नंबरचा प्रश्न "मूल्यमापन प्रशिक्षण कार्यक्रम" यावर आधारित होता· यामध्ये शाळेतील घटक चाचणीचे पेपर तयार करताना तुम्हाला वार्षिक नियोजन, घटक नियोजन यावर आधारित घेतलेल्या मूल्यमापन कृतिसत्राचा उपयोग होतो का ? असा मुक्त व संमिश्र प्रश्न विचारला होता· या प्रश्नाला होय / नाही हे दोन पर्याय दिले होते· " असल्यास कशा प्रकारे आणि नसल्यास का नाही

त्याची कारणे विचारली होती. या प्रश्नाचा उद्देश मूल्यमापन कृतिसत्राचा उपयोग माहित करुन घेणे हा होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [सा. क्र. ४.४५ ] मध्ये नमूद केला आहे.

सारणी क्रमांक ४:४५

मूल्यमापन कृतिसत्र - उपयोग

| अ.नं. | संबंधित प्र.कार्य | शिक्षकांची संख्या | | उपयोग होत असल्यास कशा प्रकारे | उपयोग होत नसल्यास का होत नाही. |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | | |
| १) | वार्षिक नियोजन घटक नियोजन या मूल्यमापन कृतिसत्राचा उपयोग होतो का ? | १२५ | १५ | वर्षभराच्या कामाचे नियोजन करता येते घटक चाचणीचे पेपर काढता येतात. गुणदान तक्ता तयार करता येतो. वेळा पत्रक गुणपत्रके तयार करता येतात. प्रश्नांची निवड, परीक्षा कशा घ्यावयाच्या. संविधान तक्ता कसा तयार करावयाचा ते समजते. पाठ्यांशानुसार गुणभार कळतो. | मराठी अध्यापन पद्धतीशी कोणतेही एक प्रात्यक्षिक कार्य करवून घेतल्याने मूल्यमापन कृतिसत्रापासून वंचित रहावे लागते. केवळ तात्त्विक भाग अभ्यासावा लागतो. |

वरील सारणीवरुन अशी माहिती मिळते की, मूल्यमापन कृतिसत्राचा उपयोग होतो. म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या १२५ म्हणजे ८९.२८ टक्के आहे. तर या मूल्यमापन कृतिसत्राचा उपयोग होत नाही म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या १५ म्हणजे १०.७१ टक्के आहे.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावली मध्ये प्रात्यक्षिक कार्यातील [ " " उपविभाग मूल्यमापन कृतिसत्राचा होता. प्रश्न क्रमांक १५ मध्ये मूल्यमापन कृतिसत्र कार्यक्रमातून तयार झालेला प्रशिक्षणार्थी शाळेतील मूल्यमापनाची जबाबदारी पार पाडण्यासाठी सामर्थ्यशाली ठरु शकेल का ? " याची द्विपर्यायामध्ये [ होय / नाही ] उत्तरे विचारली होती. तसेच ; त्यामध्येच असल्यास कशा प्रकारे सामर्थ्यशाली आहे. नसल्यास का सामर्थ्य नाही त्याची कारणे विचारली होती. या प्रश्नाना मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत [ सारणी क्रमांक ४.४६ ] मध्ये नमूद केला आहे.

सारणी क्रमांक ४.४६

मूल्यमापन कृतिसत्रा बद्दलचे सामर्थ्य

| अ.नं. | अधिव्याख्यात्यांच्या संख्या | | असल्यास कशा प्रकारे | नसल्यास का नाही |
|---|---|---|---|---|
| | होय | नाही. | | |
| १] | १२ | ०३ | मूल्यमापनाची दिशा दिली जाते. संकल्पना, रुपरेषा स्पष्ट होते. प्रश्न प्रकार, उद्दिष्टे व पाठ्यघटक या तिन्हींचा विचार करुन शास्त्रोक्त पध्दतीने घटक चाचणी तयार केली जाते. त्याचे प्रत्यक्ष ज्ञान प्रशिक्षणार्थ्याला मिळते. "मूल्यमापनातून उद्दिष्टांची पूर्ती झाली का ते पहाता येते अध्यापनाचे फलित मिळते. | * मूल्यमापनाच्या संकल्पनेत अंतर्भूत असलेल्या सर्व निकषानुसार मूल्यमापन होत नाही केले जात नाही. मूल्यमापन कृतिसत्रात ढोबळपणा आहे.फक्त पाठ टाचणे काढणे म्हणजे मूल्यमापन असा अर्थ लावला जातो.मूल्य-मापन होऊ देऊनये. प्रशिक्षणार्थ्यांच्या मनावर या कृतिसत्राचा सर्व संबोध अमल करु शकतात. |

वरील सारणी रून अशी माहिती मिळते की, मूल्यमापन कृतिसत्र कार्यक्रमातून तयार झालेला प्रशिक्षणार्थी शाळेतील मूल्यमापनाची जबाबदारी पार पाडण्यासाठी सामर्थ्यशाली ठरु शकतो. असे म्हणणा-या अधिव्याख्यात्यांची संख्या १२ म्हणजे ८०.०० टक्के आहे. आणि या मूल्यमापन कृतिसत्र कार्यक्रमातून तयार झालेला प्रशिक्षणार्थी शाळेतील मूल्यमापनाची जबाबदारी पार पाडण्यासाठी सामर्थ्यशाली ठरु शकत नाही. असे म्हणणा-या प्राध्यापकांची संख्या ०३ म्हणजे २०.०० टक्के आहे. याचा अर्थ असा होतो की, तुलनेने मूल्यमापन कृतिसत्राचा कार्यक्रम उपयुक्त आहे.

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीत प्रात्यक्षिक कार्यातील १६ नंबरचा प्रश्न मूल्यमापन कृतिसत्र कार्यक्रमाबाबत आपण समाधानी आहात का ? अशा स्वरुपाचा विचारला होता. हा प्रश्न मुक्त स्वरुपाचा होता. तसेच या प्रश्नाला अनुसरुन दोन उपप्रश्न विचारले होते ते म्हणजे "असल्यास कशा प्रकारे ?" आणि "नसल्यास का नाही.?" त्याची कारणे विचारली होती. या तिन्ही प्रश्नांना मिळालेला प्रतिसाद खालील सारणीत नमूद केला आहे. [ सारणी क्र.४.४७ ]

सारणी क्रमांक ४.४७

मूल्यमापन कृतिसत्राचे समाधान

| अ.नं. | प्रात्यक्षिक कार्य तपशिल | अधिव्याख्यात्यांची संख्या होय | नाही | असल्यास कशा प्रकारे | नसल्यास का नाही ? |
|---|---|---|---|---|---|
| [१] | मूल्यमापन कृतिसत्र कार्यक्रमाबाबत आपण समाधानी आहात का ? | १२ | ०३ | मूल्यमापन कृतिसत्रामुळे मूल्यमापनातील विविध घटकांची प्रत्यक्ष कृती कशी करावी याचे ज्ञान प्रशिक्षणार्थ्यांना देता येते. या कृतिसत्रातून चाचणीची माहिती मिळते. मूल्यमापनातून उद्दिष्टांची पूर्ती झाली का हे पहाता येते. अध्यापनाचे फलित मिळते. विद्यार्थ्यांचे योग्य मूल्य मापन करता येते. वार्षिक नियोजन, घटक नियोजन पाठ नियोजन प्रात्यक्षिकाद्वारे करुन घेता येते. | मूल्यमापन कृतिसत्र घाईगडबडीत संपवले जाते. |

वरील सारणीवरून अशी माहिती मिळते की, मूल्यमापन कृतिसत्र कार्यक्रमा बद्दल आपण समाधानी आहोत असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांची संख्या १२ म्हणजे ८०·०० टक्के आहे· आणि मूल्यमापन कृतिसत्र कार्यक्रमाबद्दल आपण समाधानी नाही असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांची संख्या ०३ म्हणजे २०·०० टक्के आहे· यावरून असा अर्थ निघतो की, मूल्यमापन कृतिसत्र समाधानकारक आहे·

शिक्षकांच्या प्रश्नावलीत २३ नंबरचा शेवटचा प्रश्न होता· या प्रश्ना मध्ये या व्यतिरिक्त तुम्हास मराठी अध्यापन पद्दतीच्या पाठ्यक्रमातील तात्त्विक किंवा किंवा सैद्दान्तिक आणि प्रात्यक्षिक कार्या विषयी या भागात न आलेली पण प्रस्तुत संशोधनाला उपयुक्त होईल अशी काही माहिती द्यावयाची झाल्यास, कृपया ती येथे मोकळ्या सोडलेल्या जागेत दयावी असा मुक्त स्वरूपाचा प्रश्न शिक्षकाना विचारला होता· या प्रश्नाचा हेतू शिक्षकाना आलेले अनुभव काही वेगळे असले तर ते जाणून घेऊन संशोधनात उपयुक्त करून घेणे, हा होता, या प्रश्नाला मिळालेला प्रतिसादर पुढील सारणीत [ सारणी क्र·४·४८ ] नमुद केला आहे·

सारणी क्र· ४·४८

४·६·

संशोधनास अन्य उपयुक्त माहिती

| अ·नं· | संशोधनास उपयुक्त माहिती |
|---|---|
| १] | विद्यार्थ्यांना वाचनाचा छंद लावण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावा· |
| २] | सतत नवनवीन माहिती विद्यार्थ्यांना सांगून त्यांच्या शब्द संग्रहात नवीन शब्दांची सतत भर घालण्याचा प्रयत्न करावा· |
| ३] | काव्यवाचन, कथाकथन, निबंध स्पर्धा यासर्वांची माहिती देऊन विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घातली पाहिजे· |
| ४] | शब्दकोषांचा वापर करून शिक्षकांनी नवीन शब्दांचे अर्थ, रंग, रूप, विद्यार्थ्यांना समजावून सांगितले पाहिजे· |
| ५] | महिन्यातून एकदा विद्यार्थी - शिक्षक पालक यांचा मेळावा आयोजित करून त्याद्वारे विद्यार्थ्यांना निबंध, काव्ये, कथा कथन यांची माहिती देऊन विद्यार्थ्यांला ज्ञानार्थी बनवावे· |

| अ.नं. | संशोधनास उपयुक्त माहिती |
|---|---|
| ६] | विद्यार्थ्यांचे पूर्वानुभव, बौध्दिक पातळी इ. गोष्टींचा विचार करुन शिक्षकाने आपल्या अध्यापन पध्दतीत बदल करावा. |
| ७] | साहित्यीक त्यांचे कार्य मराठी भाषेतील कार्य इ. माहिती घेता येणे शक्य त्यानुसार भाषा सुधारते साहित्यांचा अभ्यास करणे सोपे जाते. |
| ८] | मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रम व्यापक असल्यामुळे कालावधी वाढविणे आवश्यक आहे. |
| ९] | इतर अध्यापन पध्दती घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांनी - शिक्षकांनी मराठी अध्यापन पध्दती अभ्यासने आवश्यक आहे. कारण सर्व अध्यापन पध्दतीचा पाया मराठी अध्यापन पध्दती आहे. |
| १०] | मराठी विषयाच्या अध्यापन पध्दती वाढवाव्यात, [व्याकरण, लेखन, नाटयीकरण, रसग्रहण, समन्वयात्मक ] |
| ११] | सलग सरावासाठी पाक्षिक शाळे ऐवजी मासिक / त्रैमासिक शाळा करुन बी.एड्. पदवीचा कालावधी वाढवावा. |
| १२] | सूक्ष्म अध्यापनाचा कालावधी वाढवावा. |
| १३] | वार्षिक परीक्षा म्हणून तोंडी परीक्षा सखोल घ्याव्यात. |
| १४] | व्याकरण व व्याकरणातील मराठी विषयाचे महत्व, व्याकरणाचा प्रत्यक्षात वापर कसा करायचा याविषयी माहिती असावी. |
| १५] | मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील तात्त्विक भाग केवळ माहिती देवून शिकविण्या ऐवजी त्यांची प्रात्यक्षिके करुन दाखविणे अत्यंत गरजेचे आहे. [ आकाशवाणीवर होणारे उत्कृष्ट अध्यापनाचे पाठ ] |
| १६] | साहित्यीक व विद्यार्थी यांची वर्षातून एकदा / दोनदा चर्चा घडवून आणावी त्यामुळे विद्यार्थ्यांना पाठ्यक्रमात नेमलेल्या पाठाचे लेखक, या उतान्यांविषयी शंकानिरसन, त्यापाठीमागील भूमिका समजू शकते.<br>साहित्यात निर्माण झालेला अस्तित्ववाद<br>दलित व ग्रामीण साहित्याचा उदय |
| १७] | प्रात्यक्षिक कार्यातील लेखन कार्यांचा बोजा कमी करावा. |

| अ.नं. | संशोधनास अन्य उपयुक्त माहिती |
| --- | --- |
| १८ | सामाजिक समस्येपैकी एखादी समस्या घेऊन त्या समस्येचे साहित्यीक माध्यमातून स्पष्टीकरण व उपाय यावर चर्चा करावी. |
| १९ | मराठी अध्यापन पध्दतीसाठी एक स्वतंत्र कक्ष असावे, त्यामध्ये भाषा प्रयोगशाळा, भाषा, भाषा अध्यापन साहित्य, भाषेचे प्रात्यक्षिक कार्य, अनुभवातून तयार केलेली शैक्षणिक साधने इ. व्यवस्था असावी. त्यामुळे भाषेला आवश्यक ते वातावरण तयार होवून तिचा व्यासंग जोपासता येईल. |

वरील विधाने ही अन्यत्र उपयुक्त माहितीत नमुद केलेली आहेत. तिचा विचार प्रकरण ५ मध्ये केला आहे.

## -"ब" - विभाग -

प्रास्ताविक :-

प्रस्तुत प्रकरणाच्या "अ" विभागामध्ये मराठी साठी १३ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील १५ मराठी अध्यापन पध्दती शिकविणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलींचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन केले आहे. तसेच १४० मराठी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्या प्रश्नावल्यांचे विश्लेषण आणि अर्थ निर्वचन केले आहे.

"ब" विभागामध्ये मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचे सामर्थ्य व उपयुक्तता यांची पडताळणी करावयाची होती. त्यासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालया-मध्ये मराठी अध्यापन पध्दती अनेक वर्षे शिकविलेले आणि मराठी अध्यापन पध्दतीला मार्गदर्शन करत असलेल्या शिक्षक - प्रशिक्षकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. या मुलाखती घेण्यासाठी प्रश्नावलीत न आलेले पण मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील तात्त्विक व प्रात्यक्षिक भागाशी संबंधित असलेले प्रश्न विचारले होते. या प्रश्नांच्या अनुषंगाने मराठी विषयाची त्यांच्या अंतरगात लपलेली माहिती काढून घेणे हा एक यत्न होता. मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रम समृध्द करण्याच्या हेतूने प्रस्तुत भागाचा समावेश केला आहे.

अनेक वर्षे मराठी अध्यापन पध्दती शिकविलेल्या आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालयात नोकरीत असणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती घेऊन मिळविलेली माहिती :-

प्रकरण ४.३ मधील सारणीवरुन हे स्पष्ट होते की, अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावली मध्ये अधिव्याख्यात्यांची सर्वसाधारण माहिती मध्ये शिक्षण शास्त्र

महाविद्यालयातील नोकरीची एकूण वर्षे किती ? या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद ४.३ मध्ये नमुद केला आहे. त्यावरून आणि प्रत्यक्ष मुलाखती मध्ये केलेल्या चर्चेवरून हे सिध्द होते की, ते मराठी अध्यापन पध्दतीचे अधिव्याख्याता असून त्यांची सेवाजेष्ठता क्रमवार पुढे नमुद केलेल्या उतरत्या श्रेणीनुसार आहे.

संबंधित अधिव्याख्यात्यांची यादी
[सेवाजेष्ठतेच्या उतरत्या श्रेणीनुसार]

१] श्री.बसाप्पा बाळाप्पा सोळ्से

२] श्री.मधुकर भाऊसो वेदांते

३] श्री.के. एन्. सांगळे

४] श्री.गोपालकृष्ण मुरलीधर ढवळे

५] श्री. एस्.बी.कांबळे

६] श्री.शिरीष सदाशिव दीक्षित

७] श्री. एस्.बी.पाटणकर

८] श्री.विलास हिंदुराव पाटील

९] सौ.अनिता अजित पत्रावळे

१०] श्री. विश्वनाथ रंगराव पाटील

११] श्री.गजानन आण्णा सोलापूरे

१२] श्री.शिवाजी मारूती रायकर

१३] सौ. पी. ए. सरपोतदार

१४] सौ. ए. आर. सरदेसाई

१५] सौ.नंदिनी ~~[illegible]~~ भोसले

संबंधित अधिव्याख्यात्यांची यादीमध्ये ४ आणि ५ नंबरचे अधिव्याख्याता प्रशासकीय पदावर कार्यरत असूनही मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमामध्ये अधिकाधिक अभिरूची असणारे आहेत.

मुलाखतीमधील पहिला प्रश्न मराठी अध्यापन पध्दतीच्या सैध्दान्तिक

भागावर पाठ्यक्रमाचे सामर्थ्य अजमाविण्याच्या हेतूने विचारण्यात आला. कुशल शिक्षक होण्याच्या दृष्टिने सैध्दान्तिक भागाची उपयुक्तता, अत्यंत उपयुक्त उपयुक्त, कमी उपयुक्त, सांगता येत नाही, उपयुक्त नाही या पंचबिंदूश्रेणीपैकी दुस-या श्रेणीत, "उपयुक्त" श्रेणीत आहे असे सर्वानुमते आढळून आले.

मुलाखतीमधील दुसरा प्रश्न "मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील संबंधित भाग उपयुक्त वाटत नसल्यास त्यातील कोणता भाग उपयुक्त वाटत नाही ?" ते विचाले या प्रश्नाचा हेतू हा होता की पाठ्यक्रमातील कोणता भाग टाकाऊ, कालबाह्य, अनावश्यक आहे, हे जाणून घेणे; या प्रश्नाची मिळालेली उत्तरे अतिशय महत्त्वपूर्ण आहेत ती खाली क्रमवार नोंदली आहेत.

१] लिंग्वा फोन

२] मराठीच्या अध्यापन पध्दती

३] मराठी अभ्यासक्रम व रचना

दुस-या प्रश्नाला अनुसरून तिसरा प्रश्न विचारला होता तो म्हणजे "मराठी अध्यापन पध्दतीचा संबंधित भाग उपयुक्त वाटत नाही, त्याची कारणे कोणती ?" या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद खाली नमुद केला आहे.

१] लिंग्वाफोन हे अध्यापन साहित्य कालबाह्य झाले आहे. त्याऐवजी आपणाला टेपरेकॉर्डर किंवा दूरदर्शन या अध्यापन साधनांचा वापर करता येतो.

२] मराठीच्या अध्यापन पध्दतीमध्ये केवळ चार पध्दतींचा अंतर्भाव केलेला आहे. याशिवाय ही नवीन अध्यापन पध्दतींचा वापर करणे गरजेचे आहे. तसेच नवीन अध्यापन पध्दतीवर नव्याने लेखन करण्याची आवश्यकता भासते. उदा. व्याकरण पध्दती, लेखन पध्दती, समवाय पध्दती या पध्दतींचा पाय-या असाव्यात कारण काही पध्दतींना पाय-या नाहीत.

३] मराठी अभ्यासक्रमावर आधारीत उपयुक्त आहे. सुधारित अभ्यासक्रमावर आधारीत आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या कृतिसत्राशी ते संबंधित आहे. पण त्या अभ्यासक्रमाची पुरेशी कल्पना येत नाही. त्यासाठी संदर्भ पुस्तके, स्वाध्यायपुस्तिका उपलब्ध नाहीत

मुलाखतीमधील चौथा प्रश्न मराठीचा कुशल अध्यापक होण्यासाठी उपयुक्त होण्याच्या दृष्टीने सूचविला जाणारा सैध्दान्तिक भाग कोणता ? यावर आधारीत विचाला होता. हा भाग पुर्नरचित [१९९४] अभ्यासक्रमांशी संबंधित असलेली आवश्यकता शोधण्याच्या हेतूने विचारला या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद खाली नमुद केला आहे.

मुलाखतीला आलेली विधाने

१] पद्यात्मक गद्य व गद्यात्मक पद्य यांच्या अध्यापनाचा संयुक्त विचार व्हावा.
उदा. गंगाधर गाडगीळ, "तलावात्मक चांदणे" ठोकळेबाजरीतीने शिकवून फायद्याचे नाही. सीमारेषेवरील वाड्:मयाचा विचार होणे गरजेचे आहे. "भाषांतरीत वाड्:मय अध्यापन" असे प्रकरण घालूनतौलनीक अभ्यास व्हावा.

२] भाषा विकासाचा इतिहास जाणून घेणे आवश्यक आहे. मराठी भाषेतील नवीन प्रवाहास वाव देणे आवश्यक आहे. भाषा उच्चार शास्त्र, भाषा उत्पत्ती शास्त्रावर संशोधन होणे गरजेचे आहे.

मुलाखती मध्ये ५ नंबरचा प्रश्न प्रात्यक्षिक कार्यावर होता. मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक कार्य मराठीचा एक कुशल शिक्षक होण्याच्या दृष्टने कितपत उपयुक्त आहे याचे मत अजमाविण्यासाठी मराठी शिक्षक, प्रशिक्षकांना पंचबिंदू श्रेणीत प्रश्न विचारला गेला. त्यापैकी "उपयुक्त आहे" या श्रेणीत सर्वांनी मते दिली. उपयुक्त आहे असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांची संख्या १५ पैकी १५ म्हणजे १०० टक्के आहे. त्यावरून मराठी अध्यापन पध्दतीशी संबंधित असलेले प्रात्यक्षिक कार्य कुशल शिक्षक होण्यासाठी तयार केले आहे हे सिध्द होते.

अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती मध्ये संशोधिकेने ६ नंबरचा प्रश्न "अनावश्यक प्रात्यक्षिक कार्यावर" विचारला तो असा "बी. एड्." पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील कोणता प्रात्यक्षिक भाग उपयुक्त वाटत नाही" असे विचारले गेले. या प्रश्नाला मिळालेली उत्तरेपुढे नमुद केली आहेत.

## प्रात्यक्षिक कार्यासंबंधी आलेली उत्तरे

१. आशययुक्त अध्यापन पध्दती कृतिसत्र - पाठ टाचणे, अहवाल
२. सलग सराव पाठातील - प्रस्तावना टाचण

शिक्षक प्रशिक्षकांच्या मुलाखतीमध्ये प्रश्न क्रमांक ७ मध्ये संबंधित पाठ्यक्रमातील हा प्रात्यक्षिक कार्याचा भाग तुम्हांला का उपयुक्त वाटत नाही, त्याची कारणे विचारली होती ? या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढे नमुद केला आहे.

### प्रात्यक्षिक कार्य अनावश्यक वाटण्याची कारणे :-

१] आशययुक्त अध्यापन पध्दती संबंधी मराठी विषय तज्ञांचे प्रबोधन होणे गरजेचे शिवाय प्रात्यक्षिक कार्यासंबंधी वृत्ती, विविध अध्यापन पध्दतीनी युक्त लेखी पाठटाचणे, याबद्दल मार्गदर्शन नाही.

२] सलग सराव पाठातील प्रस्तावनेचे टाचण कसे वाढवावे, याची पुरेशी संकल्पना स्पष्ट झालेली नाही.

नमुद केलेली कारणे योग्य वाटतात.

मुलाखतीमधील ८ नंबरचा प्रश्न मराठी अध्यापन पध्दतीचा कुशल शिक्षक होण्यासाठी उपयुक्त होण्याच्या दृष्टिने आणखी कोणत्या प्रात्यक्षिक भागाची मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमात भर घालणे आवश्यक आहे ? ते विचारले होते. या प्रश्नाचा हेतू अत्यावश्यक नवीन प्रात्यक्षिक कार्य जाणून घेणे हा होता. या प्रश्नाला आलेली उत्तरे पुढे नमुद केली आहेत.

१] मराठी विषयाची साहित्य संमेलने भरविणे.

२] मराठी दिन साजरा करणे.

मुलाखतीमध्ये ९ नंबरचा प्रश्न "मराठीचा कुशल अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमात एकूणच अभ्यासक्रमात त्रुटी जाणवतात का ?" असा विचारला या प्रश्नाचे उत्तर "काही प्रमाणात" असे आले आहे.

मुलाखतीमध्ये संबंधित प्रश्नाला अनुसरुन १० नंबरचा प्रश्न विचारला होता. तो म्हणजे "त्रुटी जाणवत असल्यास कोणत्या ?" त्या प्रश्नाचे उत्तर खाली नमुद केल्याप्रमाणे मिळाले आहे.

१] मराठीचा शिक्षक हे ०९ नंबरचे प्रकरण अत्यंत महत्वाचे आहे ते उपयुक्ततेच्या श्रेणीनुसार प्रथम असल्यास अधिक चांगले.

२] "मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन" हे प्रकरण पहिल्या दोन प्रकरणानंतर असावे म्हणजे तात्त्विक भागात एकसंघपणा येईल.

३] प्रात्यक्षिक कार्याचे मूल्यमापन योग्य पध्दतीने वस्तुनिष्ठ दृष्टीने व्हावे.

४] एकूणच मराठीच्या अभ्यासक्रमाची व्याप्ती मोठी आहे. त्यामुळे कालावधी/ मराठीच्या तासिका वाढविणे सोयीचे होईल.

## ४:९ प्रस्तुत संशोधनास अन्य उपयुक्त माहिती

मुलाखतीमधील ११ नंबरचा प्रश्न "इतर उपयुक्त माहिती" बद्दल होता. या प्रश्नाला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. कारण प्रश्नावली आणि मुलाखतीच्या प्रश्नामध्ये संपूर्ण पाठ्यक्रमावर भर दिला आहे.

## ४:१० समारोप

अशा प्रकारे [पृष्ठांक ८२ ते १५७ ] मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचे सामर्थ्य व उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टिने तात्त्विक भागाचे आणि प्रात्यक्षिक कार्याचे आशय विश्लेषण, वर्गीकरण आणि अर्थ निर्वचन स्पष्ट केले.